नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ३०५ * * नागपूर * शुक्रवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## आसारामच्या आश्रमावर बुलडोझर चालणार

■ **वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. ५ :**
अहमदाबादमधील मोटेरा येथील आसारामचा मुख्य आश्रम आता कायदेशीर वादात सापडला आहे. गुजरात उच्च न्यायालयाने आश्रमाची ४५,००० चौरस मीटरपेक्षा जास्त जमीन राज्य सरकारच्या ताब्यात घेण्यास आणि बेकायदेशीर बांधकामे हटवण्यास मंजुरी दिली आहे.

या आश्रमाच्या जागेवर आता २०३० च्या कॉमनवेल्थ गेम्ससाठी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स बांधले जाईल. सध्या या जमिनीची बाजारपेठेतील किंमत ५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. गुजरात उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती वैभवी नानावती यांनी या प्रकरणी निकाल देताना राज्य सरकारला जमीन परत घेण्याची परवानगी दिली.

## संसदेतील ताल आणि तंत्र




विरोधी पक्षाने विरोधी पक्षासारखे वागावे, सत्ताधारी पक्षानेही मोठेपणा दाखवून सत्ताधारी पक्षासारखे वागावे हाच लोकशाहीचा निकष आहे. सरकारने चार चांगली कामे केली असली तर त्याची दखल घेऊन सरकारला बरे वाटेल असे बोलण्यास हरकत नसावी. सरकारनेही अमुक एका विषयाबद्दल विचारणा केल्यावर तो विषय सोडून भलत्याच विषयावर बोलण्यासाठी एखाद्या नाठाळाला विनाकारण पाठवू नये, कारण त्यामुळे मूळचा विषय बाजूला राहतो आणि भलत्याच विषयाला सुरुवात होते. गेल्या तीन चार दिवसांपासून आपल्या लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर असलेल्या संसदेत हेच सुरू आहे. काँग्रेसचे आणि सर्व विरोधी पक्षांचे विरोधी पक्ष नेते म्हणून राहुल गांधीची निवड झालेली आहे. प्रत्येक वेळी आपल्या तरकशीतून राहुल गांधी भलतेच विखारी तीर म्हणजेच बाण काढीत आहेत. सरकारच्या मर्मावर आघात करण्यासाठी आलेली एकही संधी ते सोडत नाहीत. त्यांच्या संशोधनात अनेक वेळा जनसामान्यांना आकर्षित करतील असे विषय असतात यामुळेच सरकार पक्षाची संसदेमध्ये प्रचंड गोची होते. गेल्या लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी त्यांनी मागासवर्गीय आणि अल्पसंख्याकांवरील अन्यायाचा पाढा वाचला होता. त्याच वेळी त्यांनी आपली बहुचर्चित पदयात्रा सुरू केली होती त्याचा चांगला प्रभाव होऊन काँग्रेसने शंभरी गाठली. शंभर खासदार निवडूनही आणले आणि स्वाभाविकच त्यांच्याकडे त्यामुळेच विरोधी पक्षनेते पदही आले. त्यानंतर राहुल गांधी यांनी मत चोरीचा मुद्दा मांडत पुरावेही सादर केले पण निवडणूक आयोग काहीच ऐकायला तयार नाही असे दिसून येते. या निवडणूक आयोगाला सरकार पक्षातील दोन विरुद्ध विरोधी पक्षातील एक अशा मताने निवडून आणले गेले आहे. त्याच्याकडून सरकार विरोधाची किंवा सरकार द्रोहाची अपेक्षा करणे म्हणजे मुर्खांच्या नंदनवनात राहण्यासारखे आहे. विरोधी पक्षाने सप्रमाण सरकारचे वाभाडे काढण्याचे काम करायचे असते. भाजप जेव्हा विरोधी पक्षात होता तेव्हा त्यांनी इमाने इतबारे हे काम चांगल्या प्रकारे केले. आपल्या महाराष्ट्राचे राळेगणसिद्धी येथील गांधी यांचा आधार घेऊन बड्याबड्या म्हणजे लोकांना व्यासपीठावर बोलवून तत्कालीन सरकारची अशी काही धुलाई त्याकाळी भाजपाने केली होती की, त्यानंतर काँग्रेसचे २५% ही खासदार उरले नाहीत. मग आता त्याच तत्त्वाने राहुल गांधी यांनीही आपले सेना प्रमुख नरवणे यांच्या पुस्तकावर सरकारला धारेवर धरण्यासाठी आकाशपाताळ एक केले पण राहुल गांधी यांना एका वाक्यानंतर दुसरे वाक्य लोकसभेत उच्चारताच आलेले नाही. लोकसभा अध्यक्षांना वारंवार कामकाज तहकूब करावे लागले पण राहुल गांधी यांना कोणत्याही स्थितीत बोलूच द्यायचे नाही, हे ठरल्यावर त्यांनी राहुल गांधी यांना बोलू दिले नाही म्हणजे नाही. आता या विषयावर राहुल गांधी यांनी संसदेच्या बाहेर माहिती देण्यास कमी केले नाही. मग राहुल गांधींचा विषय दुर्लक्षित करून निशिकांत दुबे नावाच्या एका वाचाळवीर खासदाराला लोकसभेत मोकाट सोडण्यात आले. त्यांना जे अकलेचे तारे तोडायचे होते ते त्यांनी तोडलेच तोपर्यंत सभापतीच्या आसनावर बसलेल्या अध्यक्षांनी हे योग्य नाही, हे योग्य नाही इतकेच सांगितले. पण त्याकडे दुर्लक्ष करून ते वाचाळवीर दुबे निशिकांत दुबे पंडित जवाहरलाल नेहरू आणि गांधी कुटुंबावर जे जे आरोप करायचे होते ते करून दुबे महाशय मोकळे झाले. एकूणच आपल्या संसदेला सध्या ज्या वातावरणाला तोंड द्यावे लागत आहे त्यावरून भारताच्या जनतेने निवडून दिलेले काही थोडे लोक कोणत्या दर्जाचे आहेत हे आपण बघितले. एखाद्या सदस्याला विरोधी पक्षाचा असल्याने बोलू न देणे आणि स्व पक्षाचा असेल तर त्याला वाट्टेल ते बोलू देणे यामुळे आपल्या संसदेचे अवमूल्यन होत आहे याची तमा कोणालाच वाटत नाही काय. दुबे सारख्यांना आवरणे सभापतींनाही शक्य नाही मात्र, त्यामुळे आपल्या संसदेला अशा प्रकारचे लोक बदनाम करतात हेच दिसून येते. सरकारने सरकार सारखे वागावे एवढीच भारतातल्या सामान्य जनतेची अपेक्षा आहे.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

# सुधारणा एक्सप्रेसवर देश स्वार

### राज्यसभेत पीएम मोदीकडून काँग्रेसची चिरफाड : विरोधकांचा सभात्याग : गदारोळामुळे लोकसभा शुक्रवारपर्यंत तहकूब

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ५ :**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाला उत्तर दिले. त्यांच्या भाषणादरम्यान विरोधकांनी घोषणाबाजी सुरू केली. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी राहुल गांधींना बोलण्याची परवानगी देण्याची मागणी केली.

पंतप्रधानांनी एक तास २७ मिनिटे भाषण केले. मोदींनी प्रश्न केला की, हे कोणत्या प्रकारचे प्रेमाचे दुकान आहे जे मोदींची कबर खोदण्याबद्दल बोलत आहे? हा सार्वजनिक जीवनाच्या प्रतिष्ठेचा अपमान नाही का?

पंतप्रधान मोदी बुधवारी संध्याकाळी ५ वाजता लोकसभेत भाषण देणार होते, परंतु विरोधकांच्या निषेधामुळे सभापती ओम बिर्ला यांनी ते पुढे ढकलले. सभापती म्हणाले की, पंतप्रधानांना सभागृहात काहीतरी अनपेक्षित घडू शकते.

लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्ताव गोंधळातच मंजूर झाला. २००४ नंतर पहिल्यांदाच पंतप्रधानांच्या अभिभाषणाशिवाय हा प्रस्ताव मंजूर झाला.

आज राज्यसभेत मोदी म्हणाले, काँग्रेस पंतप्रधानांकडे दूरदृष्टीचा अभाव होता,



आपली बरीच ऊर्जा त्यांच्या चुका सुधारण्यात खर्च होत आहे. आज देश धोरणाच्या आधारे पुढे जात आहे. सुधारणा, कामगिरी आणि परिवर्तन या मंत्राचे अनुसरण करून आपण पुढे गेलो आहोत. सत्य हे आहे की देश सुधारणा एक्सप्रेसवर स्वार होऊन जगाशी स्पर्धा करण्यास तयार आहे. आज भारत अनेक देशांशी व्यापारी करार करत आहे. युरोपियन युनियन आणि अमेरिकेसोबतच्या करारांसह एकाच वेळी २७ देशांशी व्यवहार करतो. त्यांच्या (काँग्रेस) राजवटीत करार बोफोर्स होता.

२०१४ पूर्वी, राजकारण्यांच्या आवाहनांवरून कर्जे वाटली जात होती. गरिबांना बँकेतही प्रवेश मिळू शकत नव्हता. काँग्रेसच्या राजवटीत बँकिंग क्षेत्र कोसळण्याच्या मार्गावर होते. मी पंतप्रधान झालो तेव्हा मी बँकांना विश्वासात घेतले. आज, अनुत्पादक मालमत्ता (एनपीए) १% पेक्षा कमी आहेत. बँकांचा नफा विक्रमी पातळीवर आहे.

पंतप्रधान म्हणाले की, त्यांचे सरकार रिमोट-कंट्रोल्ड आहे. माझे सरकार देखील रिमोट-कंट्रोल्ड आहे, परंतु १४० कोटी देशवासी माझे रिमोट आहेत. आमच्यासाठी, सत्ता ही चैन नाही, सेवेची जागा आहे. मुद्रा योजनेने लाखो कोटींचे कर्ज दिले, काँग्रेसने स्टार्टअप संस्कृतीला प्रोत्साहन दिले नाही.

पंतप्रधान म्हणाले की, मोहब्बत की दुकानला लागलेल्या आगीचे हे परिणाम आहेत आणि म्हणूनच ते मोदी तेरी कब्र खुदेगीचा नारा देत आहेत. देशाने काँग्रेस राजघराण्याला दशके संधी दिल्या आणि देशाने त्याचे भविष्य पणाला लावले, परंतु तुम्ही तुमच्या कुटुंबासाठी देश पणाला लावला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाला उत्तर देत असताना विरोधकांनी घोषणाबाजी सुरू केली. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी राहुल गांधींना बोलण्याची परवानगी देण्याची मागणी केली. पंतप्रधानांनी उत्तर दिले की, खरगे यांचे वय पाहता त्यांना बसून घोषणाबाजी करण्याची परवानगी द्यावी.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले, काल सभापतींच्या कार्यालयात जे घडले ते निंदनीय होते. जेव्हा सभागृह नेते राष्ट्रपतींच्या अभिभाषणाला उत्तर देणार होते, तेव्हा विरोधी पक्षाचे खासदार पंतप्रधानांच्या आसनाजवळ आले. पंतप्रधानांना हानी पोहोचवण्याचा कट होता. हे टाळण्यासाठी मी पंतप्रधानांना सभागृहात येऊ नये अशी विनंती केली. पंतप्रधानांनी माझी सूचना मान्य केली.

जर तुम्ही पोस्टर आणले तर सभागृहाचे कामकाज चालणार नाही. महिला सदस्य पंतप्रधानांच्या आसनाजवळ कशा गेल्या हे देशाने पाहिले आहे. यादरम्यान, विरोधी पक्षाच्या खासदारांनी गोंधळ सुरूच ठेवला. त्यानंतर, सभापतींनी शुक्रवारी सकाळी ११ वाजेपर्यंत लोकसभा तहकूब केली.

संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी खरगे यांना सांगितले, राहुल गांधी नियमांचे पालन करत नाहीत; तुम्ही त्यांना ते का समजावून सांगत नाही? जेपी नड्डा यांनी खरगे यांना असेही सांगितले, तुम्ही राज्यसभेत लोकसभेचे मुद्दे उपस्थित करू शकत नाही.

## दादांच्या अस्थी हरिद्वारमध्ये विसर्जित



■ **वृत्तसंस्था, हरिद्वार, दि. ५ :**
माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अस्थींचे हरिद्वार येथील व्हीआयपी घाटावर विसर्जन करण्यात आले.

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा अस्थी कलश घेऊन हरिद्वारला पोहोचले होते आणि त्यांनीच वैदिक विधी-विधानानुसार विसर्जन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक नेते उपस्थित होते, तर पवार कुटुंबातील कोणताही सदस्य कार्यक्रमात सहभागी झाला नाही.

अजितदादा पवार यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसने देशव्यापी अस्थिकलश यात्रेचे आयोजन केले आहे. या यात्रेच्या माध्यमातून काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या देशातील प्रमुख पवित्र नद्या आणि धार्मिक स्थळांवर अजितदादांच्या अस्थी विसर्जित केल्या जातील.

अस्थी कलश यात्रा ७ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. उत्तर प्रदेशातील प्रयागराज (संगम), वाराणसीयेथे अस्थी विसर्जन होईल. बिहार , झारखंड, पंजाब, जम्मू-काश्मीर आणि तामिळनाडू या राज्यांतील प्रमुख तीर्थक्षेत्रांवर अस्थी विसर्जन व शोकसभाचे आयोजन करण्यात येत आहे.

## सहकारातील कालबाह्य कायद्यांना मूठमाती

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
राज्यातील सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाला आधुनिकतेची जोड देण्यासाठी राज्य सरकारने एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. अनेक दशकांपासून कागदावरच राहिलेल्या आणि सध्याच्या काळात केवळ प्रशासकीय अडथळा ठरत असलेल्या कालबाह्य कायद्यांना आता कायमची मूठमाती दिली जाणार आहे. निर्गमित करण्यात आलेल्या शासन आदेशानुसार, हे कायदे रद्द करण्यासाठी किंवा त्यात जनहितार्थ सुधारणा करण्यासाठी सहकार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची घोषणा करण्यात आली आहे.

शासनाने पुणे येथील सहकार आयुक्त व निबंधक यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन केली असून त्यात साखर आयुक्त, वस्त्रोद्योग आयुक्त आणि पणन संचालक यांसारख्या महत्त्वाच्या पदांवरील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. केवळ कायदे रद्द करणे हाच या समितीचा उद्देश नसून आवश्यक असल्यास त्यात आधुनिक बदल करण्यावरही भर दिला जाईल. समितीला आपला सविस्तर अहवाल ६० दिवसांच्या आत सादर करावा लागणार आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील अनेक तरतुदी आजही लागू असल्याने अडचणींना सामोरे जावे लागते. हे कायदे काळाच्या ओघात अप्रासंगिक झाले असल्याने त्यात बदल केला जाणार आहे.

## बेकायदेशीर कोळसा खाणीत स्फोट

# १६ कामगारांचा मृत्यू

### अनेक मजूर अडकल्याची भीती : शोध मोहीम सुरू

■ **वृत्तसंस्था, शिलाँग, दि. ५ :**
मेघालयमधील ईस्ट जैंतिया हिल्स जिल्ह्यात गुरुवारी एका बेकायदेशीर कोळसा खाणीत स्फोट झाला. या अपघातात किमान १६ मजुरांचा मृत्यू झाला. अनेक मजूर अजूनही खाणीत अडकले असल्याची भीती आहे. ही माहिती राज्याच्या पोलिस महासंचालक आय. नोंगरांग यांनी दिली.

बचाव पथक मदत आणि शोध मोहिमेत गुंतले आहेत. हा अपघात सकाळी थांग्स्कु परिसरात झाला. नोंगरांग म्हणाल्या, आतापर्यंत १६ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. स्फोटाच्या वेळी खाणीत किती मजूर होते, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. आणखी लोक अडकले असण्याची शक्यता आहे.

## दिल्ली भेटीपूर्वी राष्ट्रवादीत हालचाल

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :**
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय



अध्यक्षपदाच्या निवडीबाबत पक्षांतर्गत हालचालींना वेग आल्याची माहिती समोर येत आहे. पुढील एक महिन्याच्या आतच अध्यक्ष निवडणूक पार पाडण्याची तयारी सुरू असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

अर्थसंकल्प अधिवेशनाच्या कालावधीतच पक्षांतर्गत प्रक्रिया पूर्ण करून नव्या अध्यक्षांची घोषणा करण्याचा विचार असल्याचे सांगितले जाते. राज्यातील पदाधिकारी आणि राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्यांच्या सहमतीने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड होण्याची शक्यता आहे.

माहितीनुसार, शपथविधीपूर्वी त्यांनी पवार कुटुंबातील ज्येष्ठ सदस्यांना भेटून त्यांना माहिती दिली होती. या सर्व घडामोडींमुळे सुनेत्रा पवार यांच्याकडे पक्ष नेतृत्वाची जबाबदारी येण्याची चर्चा अधिकच जोर धरू लागली आहे.

## ॲडव्हांटेज विदर्भ महोत्सवाचे उद्घाटन आज

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :**
असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (एआयडी) यांच्या वतीने आयोजित ॲडव्हांटेज विदर्भ २०२६ खासदार औद्योगिक महोत्सवाच्या तिसऱ्या आवृत्तीचे उद्घाटन, ६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वा. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परिसर, अंबाझरी, अमरावती मार्ग, नागपूर येथे होणार आहे.

या उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्षस्थान केंद्रीय मंत्री व खासदार औद्योगिक महोत्सवाचे प्रवर्तक नितीन गडकरी भूषवतील, तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, रोजगार मंत्री आकाश फुंडकर, वित्त राज्यमंत्री आशीष जयस्वाल, शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर तसेच उद्योग व पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक प्रामुख्याने उपस्थित राहतील.

देशभरातील नामवंत उद्योगपतींचीही या महोत्सवात उपस्थिती राहणार आहे. त्यामध्ये लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक बालसुब्रमण्यम प्रभाकरन, अदानी समूहाचे (एअरपोर्ट्स) संचालक जीत अदानी, तसेच महिंद्रा अँड महिंद्राचे कार्यकारी संचालक राजेश जेजुरीकर यांचा प्रामुख्याने समावेश आहे. याशिवाय पर्नोड रिकार्ड इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक जीन टोबूल, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे सचिव डॉ. पी. अनबलगन (आयएएस) तसेच मुख्यमंत्री यांचे सल्लागार (गुंतवणूक, उद्योग व तंत्रज्ञान) कौस्तुभ धवसे यांचीही उपस्थिती राहणार आहे.

दिवसभर शिक्षण, डिफेन्स, फूड प्रोसेसिंग, फिशरी आणि डेअरी विषयावर तांत्रिक सत्र होणार असून सायंकाळी ६ वाजता नागपूरच्या प्रसिद्ध गायिका श्रीनिधी घटाटे यांचा लाईव्ह कॉन्सर्ट होणार आहे. विद्यार्थी, उद्योजक, नागरिक सर्वांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

व्हीआयपी, स्टॉलधारक व व्हिजिटर्ससाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. स्टॉलधारक व व्हिजिटर्स यांनी नागपूर विद्यापीठाच्या अंबाझरी अमरावती मार्गावरील प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वारातून आता प्रवेश करावा, असे कळवण्यात आले आहे.

## काँग्रेसमधला कलह दिल्लीत मिटला

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :**
चंद्रपूर काँग्रेसमधील विधिमंडळ नेते आणि आमदार विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील अंतर्गत कलह अखेर दिल्ली दरबारी मिटल्याचे समोर आले आहे. त्यानुसार चंद्रपूर महापालिकेचे महापौरपद धानोरकर गटाकडे, तर उपमहापौरपदी वडेट्टीवारांच्या समर्थकाची वर्णी लागणार आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेलाही सत्तेत वाटा मिळणार आहे.

गेले काही दिवस चंद्रपूर महापालिकेतील काँग्रेस बाबत संभ्रमाचे वातावरण होते. त्यात आमदार विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या अंतर्गत वाद सुरू होता. मात्र, दिल्लीत काँग्रेस पक्षश्रेष्ठींशी चर्चा केल्यानंतर अखेरीस त्यावर तोडगा निघाला.

चंद्रपूर वादावर विजय वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषद घेतली. ते म्हणाले की, 'महाराष्ट्र काँग्रेस आणि दिल्लीतून घेण्यात आलेल्या निर्णयानुसार खासदार प्रतिभा धानोरकर आणि गटनेता राजेश अरुण म्हणतील तो महापौर होईल.काँग्रेसचे गटनेता म्हणून राजेश अडूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उपमहापौरपदी आमचे वसंत देशमुख यांनी अर्ज भरला आहे. मात्र, आम्ही महापौर पदाचा अर्ज भरला नाही. तर धानोरकरांकडून चार महिलांनी अर्ज भरलेत.

वडेट्टीवार म्हणाले की, 'उपमहापौर पदी अनुभवी आमचे समर्थक वसंत देशमुख यांनी अर्ज भरला, तर गटनेते पदी वडेट्टीवार समर्थक राजेश अडूर यांची नियुक्ती करण्यात आली. राजेश अडूर यांच्या नियुक्तीचे पत्र देखील पक्षाकडून अधिकृतरित्या विभागीय आयुक्तांना देण्यात आले आहे. शिवसेना उबाठाकडून देखील आज महापौर पदी अर्ज दाखल करण्यात आला आहे.

## 'त्या' विमानातून जानकरही जाणार होते?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर मोठी माहिती पुढे येत आहे. अजित पवार यांच्यासोबत माजी मंत्री महादेव जानकर मुंबईहून बारामतीसाठी जाणार होते. विशेष म्हणजे दोघेही एकाच विमानातून प्रवास करणार होते. मात्र, त्यांना पोहोचण्यास उशीर झाल्याने अजित पवार पुढे निघून गेले.





माजी मंत्री महादेव जानकर यांनी याबाबत माहिती दिली आहे. ज्यादिवशी भीषण अपघात झाला, त्यादिवशी महादेव जानकर हे देखील त्यांच्यासोबत विमानातून जाणार होते. महादेव जानकर यांनी म्हटले की, त्यादिवशी अजित पवार यांनी मला बारामतीमध्ये येण्यासाठी निमंत्रण दिले होते. मी आणि अजित पवार एकाच विमानातून जाणार होतो. पण मला पोहोचायला उशीर झाला. अजित पवार यांचे विमान ठरलेल्या वेळेत निघून गेले. मला विमानतळावर जाण्यास उशीर झाल्याने माझा जीव वाचला. तथापि, राज्याने एक मोठा नेता नक्कीच गमावले आहे, असे महादेव जानकर म्हणाले.

## दादांचा विमान अपघात अहवाल सरकारधार्जिणा असेल..

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :**
उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील अकाली निधनाने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न असतानाच, सिंचन घोटाळा पुराव्यानिशी बाहेर काढणारे जलसिंचन विभागाचे माजी मुख्य अभियंता विजय पांढरे यांनी खळबळजनक प्रतिक्रिया दिली आहे.

अजित पवारांचा अपघात दुर्दैवी आहे, मात्र सरकारी चौकशी यंत्रणांवर माझा विश्वास राहिलेला नाही, अशा शब्दांत पांढरे यांनी प्रशासकीय आणि न्यायालयीन व्यवस्थेवर तोफ डागली आहे. ते म्हणाले, अजित पवारांबाबत जी घटना घडली ती अतिशय दुर्दैवी आहे. घटनेवर अनेकांनी शंकाही उपस्थित केल्या व शंका येईल अशा काही घटनाही घडलेल्या आहेत.

अजित पवारांनी निधनापूर्वी भाजपच्या १०० कोटींच्या घोटाळ्याची फाइल माझ्याकडे आहे, असे विधान केले होते. त्यानंतर लगेच हा अपघात झाला, त्यामुळे अनेकांना घातपाताची शंका येते. मात्र, वैयक्तिकरीत्या मला यात घातपात वाटत नाही. तरीही, डीजीसीए (नागरी विमान वाहतूक महासंचालनालय) या अपघाताचा जो



अहवाल देईल, तो सरकार आपल्या मर्जीनुसार तयार करून घेईल, अशी मला भीती आहे. सत्य लपवून ठेवले जातात असा अनुभव आहे, असा दावाही त्यांनी केला.

सिंचन घोटाळ्याबाबत भाष्य करताना विजय पांढरे यांनी न्यायव्यवस्थेवरही गंभीर आरोप केले. मी अजित पवारांवर आरोप केले ते व्यक्तिशः किंवा द्वेषातून केले नाही. राज्यातील जनतेचा पैसा हा अनाठाही खर्च होत होता म्हणून यंत्रणेवर केले होते, व्यक्तीगत आकस नव्हता, असे ते म्हणाले.

श्री गजानन महाराज संस्थान, शेगांव जि. बुलढाणा
(पब्लिक ट्रस्ट रजि. नं. ए-२५० बुल.)
श्रींचा १४८ वा प्रगटदिन उत्सव
दरवर्षी प्रमाणे यावर्षी श्रींचा १४८ वा प्रगटदिन उत्सव दि.०२/०२/२०२६ ते ०८/०२/२०२६ पावेतो परंपरेनुसार कार्यक्रम होऊन संपन्न होईल. आपण सर्वांनी उत्सवात सर्वतोपरी सहभागी व्हावे, ही विनंती.
श्री मंदिर परिसरात भाविकांची प्रचंड गर्दी होईल हे लक्षात घेता व काही अप्रिय घटना घडू नये याची दक्षता म्हणून वन-वे (एकेरी मार्ग) करण्यात आला आहे. त्यात श्रींची समाधि दर्शन व्यवस्था, श्रीमुख दर्शन व्यवस्था, श्री महाप्रसाद, श्री पारायण कक्ष मंडप इत्यादी व्यवस्था केलेली आहे.
श्री संस्थानच्या शेगांव व शाखांसह भक्तनिवासातील खोल्या अगोदरच ऑनलाईन बुकींग करण्याची कोणतीही पध्दती प्रचलित /अस्तित्वात नाही.
अनधिकृत वेबसाईटचे माध्यमातून भक्तनिवासातील खोल्या ऑनलाईन बुकींग करण्याचे नांवाखाली भक्तांची फसवणूक होण्याचे प्रकार समोर येत आहेत. कृपया भक्तांनी याची नोंद घेऊन सावधगिरी बाळगावी, ही विनंती.
व्यवस्थापकीय विश्वस्त

## सत्तेशिवाय जयंत पाटील राहू शकत नाहीत
# भाजपात उडी घेणार : सदाभाऊ खोत



■ सांगली : राज्याचे माजी अर्थमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे नेते जयंत पाटील हे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचा दावा आमदार सदाभाऊ खोत यांनी केला आहे. त्यांना घ्यायचे की नाही हे तुम्ही ठरवा, पण सत्तेशिवाय ते फार दिवस राहू शकत नाहीत. कधी उडी मारायची, याचीच ते वाट पाहत आहेत, असा टोला त्यांनी जयंत पाटील यांचे नाव न घेता लगावला. सांगली जिल्ह्यातील वाळवा येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना महायुतीच्या जिल्हा परिषद निवडणूक प्रचारसभेत सदाभाऊ खोत बोलत होते. यावेळी त्यांनी जयंत पाटील यांच्या कार्यकाळावर जोरदार टीका केली. सदाभाऊ खोत म्हणाले की, 20 वर्षे मंत्री राहूनही त्यांनी समाजासाठी काहीच केले नाही. साधे रस्तेही झाले नाहीत, कोणताही विकास केला नाही. जनता गरिबीतच राहावी आणि आपल्यासमोर गुलामासारखी यावी, या मानसिकतेतून त्यांनी काम केले. पण आता परिस्थिती बदलत आहे. काटे उलटे फिरू लागले आहेत. ते फार दिवस तिकडे बसणार नाहीत, लवकरच भाजपमध्ये येतील. सदाभाऊ खोत म्हणाले की, यावेळी त्यांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या स्मारकाचाही उल्लेख केला. क्रांतीसिंह नाना पाटील यांची सेवा नाईकवाडे यांनी केली, पण त्यांचे स्मारक उभारावे असे यांना कधी वाटले नाही. 2018 मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नावाने कॉलेजसाठी निधी मंजूर केला होता.

# मुंबईत वैद्यकीय परिषद 'पल्स'चे आयोजन

## 'पल्स' परिषदेच्या माध्यमातून वैद्यकीय वेलनेस पर्यटनाचा 'महाराष्ट्र ब्रँड' निर्माण करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :

वैद्यकीय क्षेत्रात जागतिक स्तरावर महाराष्ट्राला ओळख निर्माण करून देणाऱ्या 'पल्स' या वैद्यकीय परिषदेचे आयोजन मुंबईत जिओ वर्ल्ड सेंटर, येथे २७ व २८ मार्च २०२६ रोजी करण्यात येणार आहे. या परिषदेत देशातून आणि जगभरातून वैद्यक क्षेत्रातील २९०० पेक्षा जास्त तज्ज्ञ, अभ्यासक आणि मान्यवर सहभागी होणार आहेत.




'पल्स' वैद्यकीय परिषदेचे भव्य दिव्य आयोजन करून परिषदेच्या माध्यमातून 'वेलनेस' उपचारांचा वैद्यकीय पर्यटनातील 'महाराष्ट्र ब्रँड' निर्माण करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी परिषद आयोजनाच्या आढावा बैठकीत दिले. यावेळी वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ उपस्थित होत्या.

पारंपरिक खर्चिक असलेल्या वैद्यकीय उपचाराऐवजी 'वेलनेस' उपचारांकडे नागरिकांचा ओढा वाढत आहे. 'वेलनेस' उपचार पद्धतीत राज्यात मोठ्या प्रमाणावर वाव आहे. त्यामुळे आयुषमधील उपचार पद्धतींना 'वेलनेस' कडे वळविण्यात यावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, वैद्यकीय क्षेत्रामध्ये अनेक स्टार्टअप कार्यरत आहेत. अधिकाधिक स्टार्टअपला परिषदेत सहभागी करून घ्यावे. जेणेकरून परिषदेमध्ये या क्षेत्रात होणाऱ्या नवनवीन संशोधनावर आधारित चर्चांमधून कर्करोगासारख्या आजारांवर सहज, सोपी आणि परवडणारी उपचार पद्धती विकसित करण्यात स्टार्टअपला मदत होईल.

वैद्यकीय क्षेत्रातील जागतिक गुंतवणूकदार या परिषदेत सहभागी होतील याबाबत दक्षता घ्यावी, त्यांच्या माध्यमातून राज्यात होत असलेल्या 'बल्क ड्रग पार्क' मध्ये गुंतवणूक होईल, यासाठी प्रयत्न करावे. परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी संबंधित विभागांनी नोडल अधिकारी नियुक्त करावेत. संबंधित विभागांनी समन्वयाने काम करीत परिषदेच्या आयोजनातून राज्याला वैद्यकीय क्षेत्रात मोठा लाभ मिळवून द्यावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या, ग्रामीण भागात आरोग्य यंत्रणा बळकट होण्यासाठी परिषदेत वैद्यक क्षेत्रातील गुंतवणूकदारांसोबत करार करण्यात यावेत. यामधून ग्रामीण भागात आरोग्याच्या दर्जेदार सुविधा निर्माण होतील. मानसिक आजारांवरील नवनवीन उपचार पद्धती, वैद्यकीय पर्यटन विकसित होण्यासाठी परिषदेच्या संधीचा उपयोग करण्यात यावा.

बैठकीस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी, अन्न व औषध प्रशासन आयुक्त श्रीधर दुबे, मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे, मुख्यमंत्री यांच्या सल्लागार पूजा मिसाळ, आदी उपस्थित होते.

### अशी असणार परिषद

* परिषदेचे उद्घाटन 27 मार्च रोजी होईल.
* परिषदेत प्लेनरी, 360 डिग्री डोम, आदींसह स्टार्टअपसाठी वेगळी दालने असणार आहेत.
* तसेच उद्योग क्षेत्रातील नवनवीन संशोधनाची माहिती असणारी दालने असणार आहेत.
* परिषदेत जागतिक आरोग्य संघटना, युनेस्को यांचे उच्चपदस्थ अधिकारी सहभागी होतील.
* जगातील नामांकित वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या विद्यापीठांचे कुलगुरू आणि संशोधकही परिषदेत सहभाग घेणार आहेत.
* भविष्यातील वैद्यकीय शिक्षण, डिजिटल हेल्थ आणि कृत्रिम बुद्धिमत्ता, उपचार पद्धतीतील संशोधन या विषयांवर पॅनल चर्चा, कार्यशाळा आणि केस स्टडीज होणार आहेत.

## पार्थ पवार प्रकरणात उच्च न्यायालयाचे ताशेरे दुर्लक्ष करण्यासारखे नाहीत



■ मुंबई : मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणात पार्थ पवार यांच्या नावासंदर्भात उच्च न्यायालयाने काही ताशेरे मारले होते. ते दुर्लक्ष करण्यासारखे नाहीत. पार्थ पवार यांनी याप्रकरणी चौकशीला सामोरे जाऊन नंतर क्लीन होऊन बाहेर पडायला हवे, असे मत उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केले आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी पक्ष विलीनीकरणावर सुरू असलेल्या चर्चेदरम्यान संजय राऊत यांचे हे वक्तव्य महत्त्वाचं ठरत आहे. शरद पवार यांनी सुनेत्रा पवार यांच्यासोबत एक ते दीड तास बंद दाराआड चर्चा केली. यात आश्चर्य वाटण्यासारखं काहीही नसल्याचे संजय राऊत यांनी म्हटल आहे. वास्तविक दोन्ही पक्षांची विलीनीकरणाची चर्चा आधीपासून सुरू होती. याची माहिती आमच्याकडे देखील होती. मात्र त्यामध्ये शिवसेना किंवा काँग्रेस यांना बोलण्याचा काही अधिकार नाही. या दोन्ही पक्षांचे विलीनीकरण झाल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणावर होणारा परिणाम? याविषयी आम्ही नंतर बोलू, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे. मात्र तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांच्यासारख्या नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्या चेल्यांना हे विलीनीकरण नको आहे.

## विलीनीकरणाबाबत कुटुंबात कोणतीही चर्चा झालेली नाही : रोहित पवार

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ५ :

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताने महाराष्ट्र सुन्न असतानाच, आता या अपघाताबाबत नवनवीन माहिती समोर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. "विमानात नक्की काय घडलं? कशा प्रकारे ही दुर्घटना झाली? याबाबत आमच्याकडे काही माहिती आली असून, ९ फेब्रुवारीनंतर मी यावर स्पष्टपणे भाष्य करणार आहे," असे आमदार रोहित पवार यांनी सांगितले. आहे. तसेच दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत पवार कुटुंबात कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही, असेही त्यांनी सांगितले.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी मुंबईहून बारामतीला येत असताना विमान अपघातात निधन झाले. या घटनेबाबत बोलताना रोहित पवार म्हणाले की, "एखादी मोठी घटना घडल्यानंतर नेमकं सत्य काय आहे, हे लोकांसमोर येणं महत्त्वाचं असतं. आमच्याकडे काही प्राथमिक माहिती आली आहे, आम्ही आणखी माहिती मागवत आहोत. ९ तारखेनंतर सर्व काही स्पष्टपणे मांडले जाईल." त्यांच्या या वक्तव्यामुळे अपघातामागे काही तांत्रिक कारणांव्यतिरिक्त इतर काही गोष्टी होत्या का? अशी चर्चा आता सुरु झाली आहे.



अजित पवारांवर ज्या विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात अंत्यसंस्कार झाले, तिथेच त्यांचे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय पवार कुटुंबाने घेतला आहे. यासंदर्भात आज ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत महत्त्वाची बैठक पार पडली. पार्थ पवार आणि रोहित पवार यांनी प्रत्यक्ष स्मारकाच्या जागेबाबत चर्चा केली. अजितदादांचे ३५ ते ४० वर्षांचे राजकीय कार्य लोकांपर्यंत पोहोचावे आणि त्यांच्या स्मृतींचे जतन व्हावे, हा यामागचा मुख्य उद्देश असल्याचे कुटुंबाने स्पष्ट केले.

अजित पवारांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची जोरदार चर्चा सुरू आहे.गेल्या २८ जानेवारीपासून आजपर्यंत पवार कुटुंबात कुठलीही राजकीय चर्चा झाली नाही.

## भीषण अपघातात महिलेचा दुर्दैवी मृत्यू

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ५ :

कर्वे रस्त्यावरील जलसा हॉटेलसमोर झालेल्या भीषण अपघातात ६० वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. संबंधित महिला मुलाच्या दुचाकीवर मागे बसून जात असताना, सिग्नल सुटल्यावर एका दुचाकीस्वाराने निष्काळजीपणे वाहन वळवताना महिलेच्या दुचाकीला धडक दिली. त्यामुळे महिला रस्त्यावर पडली. मागून येणाऱ्या मालवाहू वाहनाचे चाक त्यांच्या अंगावरून गेले.

सिताबाई अजिनाथ शिंदे (वय ६०) असे या अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत त्यांचा मुलगा तुळशीदास अजिनाथ शिंदे (वय ३८, रा. संभानगर झोपडपट्टी, कर्वेनगर) यांनी अलंकार पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी (३ फेब्रुवारी) सकाळी सव्वाआठच्या सुमारास तुळशीदास शिंदे हे आईसोबत दुचाकीवरून जात होते. कर्वे रस्त्यावर जलसा हॉटेलसमोर सिग्नल सुटल्यानंतर एका दुचाकीस्वाराने उजव्या बाजूने अचानक वाहन वळवत त्यांच्या दुचाकीला धडक दिली आणि पुढे निघून गेला. या धडकेत तुळशीदास व त्यांची आई रस्त्यावर पडले.

## संसदेत पंतप्रधान मोदींवर हल्ल्याचा प्रयत्न?
# आम्ही बॅनर घेऊन गेलो होतो, हत्यार नाही

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ५ :



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर संसदेत विरोधकांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला असल्याचा दावा भाजपकडून केला जात आहे. बुधवारी संध्याकाळी 5 वाजता जेव्हा सभागृहाचे कामकाज सुरू झाले, तेव्हा विरोधी पक्षाच्या महिला खासदारांनी सत्ताधारी नेत्यांच्या खुर्च्यांना घेराव घातला. यामध्ये पंतप्रधान मोदींच्या खुचीर्चाही समावेश होता. महिला खासदारांच्या हातात मोठे बॅनर होते, ज्यावर लिहिले होते - जे योग्य आहे, ते करा. यावेळी मोदी त्यांच्या खुर्चीवर नव्हते. परंतु, या झालेल्या गोंधळामुळे अध्यक्षांनी कामकाज तहकूब केलए होते. मंगलबवारी झालेल्या गोंधळानंतर ८ विरोधी खासदारांच्या निलंबनाच्या निषेधार्थ आज पुन्हा गोंधळ झाला होता. परंतु, यावरून थेट पंतप्रधानांवर हल्ला करण्याचा विरोधकांचा डाव असल्याचा दावा भाजपकडून करण्यात आला आहे.

काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी संसदेत झालेल्या गोंधळावर प्रतिक्रिया दिली आहे. त्या म्हणाल्या, आमची अपेक्षा आहे की अध्यक्षांनी निष्पक्षपणे काम करत आम्हाला न्याय द्यावा. विरोधी पक्षातले आहेत, त्यांना बोलू द्यायचे नाही. सत्ताधारी पक्षातले जे आहेत ते अश्लील बोलतात तरी त्यांना बोलू द्यायचे, ही भूमिका योग्य नाही. निशिकांत दुबे यांनी महिलांचा अपमान केला आहे आणि अश्लील बोलले आहेत.

जेव्हा विरोधी महिला खासदार पंतप्रधान मोदींच्या खुर्चीजवळ गेले तेव्हा निशिकांत दुबे होते का? असा प्रश्न विचारला असता वर्षा गायकवाड यांनी हो म्हटले. पुढे त्या म्हणाल्या, आम्ही जिथे कुठे बसलो आहोत, त्याचा अधिकार आम्हाला संविधानाने दिला आहे. लोकशाहीने दिलेल्या अधिकारांचा आम्ही वापर करू शकतो, संवैधानिक हत्याराचा आम्ही वापर करू शकतो. आम्ही बॅनर घेऊन उभे होतो. बॅनर घेऊन उभे होतो तर यायचे होते, आम्ही काय हत्यार घेऊन उभे होतो का मारायला? असा सवाल गायकवाड यांनी उपस्थित केला. भाजपच्या नेत्यांनी दावा केला की हातात काचेच्या बांगड्या होत्या, हत्यार म्हणून वापरण्यासाठी. त्यावर वर्षा गायकवाड म्हणाल्या, हातात बांगड्याच नाहीत, लग्नापासून घातल्या नाहीत.

## नवी मुंबईत शिवसेनेला गणेश नाईकांचा धक्का



■ मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेच्या राजकारणात आज महत्त्वाची घडामोड घडली. महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने निर्विवाद वर्चस्व सिद्ध करत दोन्ही पदांवर बिनविरोध निवड करून घेतली. महायुतीतील घटक पक्ष असलेल्या शिवसेना शिंदे गट आणि भाजपमध्ये सुरुवातीला स्पर्धेची चिन्हे दिसत असताना, अखेरीस नाट्यमय घडामोडींनंतर निवडणूक न होता भाजपच्या उमेदवारांची निवड निश्चित झाली. त्यामुळे नवी मुंबई महापालिकेची सूत्रे पूर्णपणे भाजपच्या हाती गेल्याचे स्पष्ट झाले. महापौरपदासाठी भाजपच्या सुजाता पाटील आणि उपमहापौरपदासाठी दशरथ भगत यांची नावे पुढे आली होती. शिवसेना शिंदे गटानेही दोन्ही पदांसाठी नामांकन अर्ज दाखल केले होते. अलीकडील महापालिका निवडणुकीतील चुरस पाहता या निवडीतही थेट लढत होईल, अशी चर्चा रंगली होती. मात्र, निवडणुकीच्या दिवशी परिस्थिती पालटली. शिंदे गटाच्या उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्याने दोन्ही पदांवर भाजपचे उमेदवार बिनविरोध निवडून आले. या अनपेक्षित घडामोडींमुळे राजकीय वतुर्ळात चर्चा रंगली. महायुतीतील अंतर्गत समन्वय आणि स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणे यांचा परिणाम या निर्णयावर झाल्याचे बोलले जात आहे.

## नवी मुंबईच्या महापौरपदी भाजपाच्या सुजाता पाटील यांची निवड



■ महासागर प्रतिनिधी
नवी मुंबई, दि. ५ :

नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदाच्या निवडणुकीत भाजपाच्या सुजाता पाटील यांनी बिनविरोध विजय मिळवला आहे. भाजपाचेच दशरथ भगत यांचीही उपमहापौरपदी निवड झाली आहे. सरोज पाटील यांनी यापूर्वी शिवसेनेच्या एकनाथ शिंदे गटाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. तथापि, त्यांनी गुरुवारी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आणि त्यामुळे भाजप उमेदवाराचा विजय निश्चित झाला.

भाजपाने ६५ नगरसेवक जिंकले होते, तर शिवसेनेच्या एकनाथ शिंदे गटाचे ४२ नगरसेवक आहेत. दोन्ही पक्षांनी युती करून निवडणूक लढवली होती, त्यामुळे महापौर या आघाडीतून निवडून येईल हे निश्चित झाले होते. तथापि, दोन्ही गटांमध्ये मतभेद निर्माण झाले आणि दोघांनीही आपापले उमेदवार उभे केले. तथापि, गुरुवारी त्यांनी समेट केला आणि शिवसेनेने आपला उमेदवार मागे घेतला. उपमहापौरपदासाठी शिवसेनेने आकाश बाळकृष्ण माधवी यांना उमेदवारी दिली होती. नवी मुंबईत महापौर निवडण्यासाठी ६६ नगरसेवकांचा पाठिंबा आवश्यक होता. भाजपाकडे ६५ नगरसेवक होते आणि एका अपक्ष नगरसेवकाचा पाठिंबा होता. घोडेबाजार टाळण्यासाठी, भाजपाने आपल्या नगरसेवकांना एका हॉटेलमध्ये पाठवले. नंतर त्यांना मतदानासाठी परत आणण्यात आले. मतदानादरम्यान, भाजपाने सहज विजय मिळवला. सुजाता सूरज पाटील या भाजपा नेते सूरज पाटील यांच्या पत्नी आहेत. सूरज पाटील हे गणेश नाईक यांचे विश्वासू मानले जातात. ते अत्यंत आक्रमक नेते आहेत. सुजाता नेरुळ परिसरातून दुसऱ्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आल्या आहेत. त्या एक उदयोन्मुख नेत्या म्हणून स्वतःला स्थापित करत आहेत.

## महाराष्ट्राचे १५ आमदार लंडनच्या अभ्यास दौऱ्यावर!

■ मुंबई : महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे १५ आमदार १५ ते २२ फेब्रुवारी दरम्यान लंडनच्या अभ्यास दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात भाजप, शिंदेसेना आणि ठाकरेसेनेच्या आमदारांचा समावेश आहे. दौऱ्याचे मुख्य उद्दिष्ट लंडनमधील शहरी व्यवस्थापन, पायाभूत सुविधा आणि प्रशासकीय कार्यपद्धतीचा अभ्यास करणे असून, नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा आणि सुविधा यांचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे. भाजपकडून या दौऱ्यात विक्रांत पाटील आणि निरंजन डावखरे सहभागी होत आहेत, शिवसेनेकडून मनीषा कायंदे तर उबाठाकडून वरुण सरदेसाई यांचा समावेश आहे.

लोकरंजन

## 'तिघी'मधील भावस्पर्शी गाणं प्रेक्षकांच्या भेटीला

आई आणि मुलींचं नातं हे केवळ जन्माने जोडलेलं नसतं, तर ते आयुष्यभर साठत गेलेल्या आठवणींनी, संस्कारांनी, न बोललेल्या भावनांनी आणि एकमेकांसाठी असलेल्या मूक समजुतींनी घडलेलं असतं. कधी त्या नात्यात हसरे, हलके क्षण असतात, तर कधी अपेक्षा, वेदना आणि अंतरहीन्न तरीही मनाच्या खोल कुठेतरी हे नातं कायम घट्ट गुंफलेलं असतं.

अशाच भावनांचा, नात्यांच्या नाजूक छटांचा हळुवार वेध घेणारा आगामी मराठी चित्रपट म्हणजे तिघी. या चित्रपटातील हास जराशी हे भावनिक गाणं नुकतंच प्रेक्षकांच्या भेटीला आलं असून, अल्पावधीतच ते मनाला स्पर्श करून जात आहे. आई आणि मुलींच्या नात्यातील हळवे, आनंदी, कधी वेदनांनी ओथंबलेले, तर कधी आशेने उजळलेले क्षण या गाण्यात सुंदरपणे उलगडताना दिसतात. दुःख आणि सुख, अंतर आणि आपुलकी या सगळ्यांचा एक भावनिक प्रवास हे गाणं मांडतं.




जितेंद्र जोशी यांच्या संवेदनशील आणि अर्थपूर्ण शब्दांना अद्वैत नेमळेकर यांचं हृदयाला भिडणारं संगीत लाभलं असून, सोनू निगम यांच्या जादुई आवाजामुळे हे गाणं अधिकच भावस्पर्शी झालं आहे.

भारती आचरेकर, सोनाली कुलकर्णी आणि नेहा पेंडसे बायस या तिघींवर चित्रित झालेलं हे गाणं त्यांच्या नात्यातील भावनिक बंध, हसरे क्षण आणि न बोललेली वेदना प्रभावीपणे समोर आणतं.सुप्री मीडिया प्रस्तुत आणि कोक्लिको पिक्चर्स निर्मित तिघी या चित्रपटात भारती आचरेकर, सोनाली कुलकर्णी आणि नेहा पेंडसे बायस यांच्या प्रमुख भूमिका असून, चित्रपटाची कथा व दिग्दर्शन जीजिविषा काळे यांनी केलं आहे. ■ ■ ■

## बालकलाकार अवनी जोशीची मर्दानी ३ मध्ये मध्यवर्ती भूमिका

राणी मुखर्जीचा बहुप्रतिक्षित मर्दानी ३ हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला असून सिनेमाची कथा मुलींच्या बेपत्ता होण्याच्या आणि अपहरणाभोवती फिरते. यशराज फिल्मस्ची निर्मिती असलेल्या अभिराज मिनावाला यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या चित्रपटात अभिनेत्री राणी मुखर्जीबरोबरच मल्लिका प्रसाद आणि जानकी बोडीवाला महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.

ट्रेलरनंतर खलनायिकेच्या भूमिकेतील मल्लिका प्रसाद यांच्या अभिनयाची विशेष चर्चा होत आहे. या चित्रपटाची आणखीन एक विशेष बाब म्हणजे मराठमोळी बालकलाकार अवनी जोशी या चित्रपटामध्ये एका महत्वपूर्ण भूमिकेत झळकणार असून अभिनेत्री राणी मुखर्जी सोबत झळकण्याची संधी तिला या चित्रपटाच्या निमित्ताने मिळाली आहे.आजवर अनेक मराठी मालिका, रिअॅलिटी शो आणि नुकत्याच प्रदर्शित झालेल्या जारण या चित्रपटामध्ये आपण तिच्या अभिनयाची उत्तम झलक पाहिली होती.

अवनी जोशी ही सुप्रसिद्ध गायक अनिरुद्ध जोशी आणि गायिका रसिका जोशी यांची मुलगी आहेयशराज फिल्मच्या टीमकडून तिला ऑडिशनसाठी बोलवण्यात आले आणि या ऑडिशनमधून एक एक टप्पे पार पाडत तिने हा रोल पटकावला. ■ ■ ■




## धनुष्यबाणाच्या उमेदवाराला मतदान करू नका

■ वृत्तसंस्था, सोलापूर, दि. ५ :



जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांच्या रणधुमाळीत सोलापूर जिल्ह्यात काल एक अजब राजकीय पेच पाहायला मिळाला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बार्शी आणि मोहोळ तालुक्यात घेतलेल्या सभांमध्ये चक्क विरोधी पक्षांच्या आमदारांची उपस्थिती आणि त्यानंतर स्वतःच्याच उमेदवाराला मतदान न करण्याचे आवाहन केल्यामुळे मतदारांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

मोहोळ तालुक्यातील नरखेड पंचायत समिती गणाच्या निवडणुकीवरून सध्या शिवसेनेत मोठा गोंधळ उडाला आहे. येथे शिवसेनेकडून ज्योत्स्ना पाटील यांनी धनुष्यबाण चिन्हावर उमेदवारी अर्ज भरला आहे, तर मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून प्रगती दगडे रिंगणात आहेत. युती असूनही एकाच गणातून दोन उमेदवार उभे राहिल्याने प्रचाराच्या सुरुवातीलाच संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते.

कालच्या सभेत भाषण सुरू असताना स्थानिक नेते संतोष पाटील यांनी एकनाथ शिंदेंना एक चिठ्ठी दिली. ती वाचताच शिंदेंनी तुतारी चिन्हावरील उमेदवाराचा प्रचार केल्याचे दिसून आले. मात्र, याच सभेत शिवसेनेच्या चिन्हावर उभ्या असलेल्या उमेदवाराला मत देऊ नका, आघाडीचा धर्म पाळा, असे थेट आवाहन त्यांनी केल्याने राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली.

नरखेड गटात ज्योत्स्ना पाटील या आपल्या अधिकृत उमेदवार नाहीत. येथे महायुतीचा धर्म पाळला गेला पाहिजे. असे शिंदे म्हणाले. आपल्याच पक्षाच्या चिन्हावर उभ्या असलेल्या उमेदवाराला मतदान न करण्याचे आवाहन पक्षप्रमुखांनी केल्याने उपस्थितांच्या भुवया उंचावल्या.

शिवसेना पक्षाचे प्रमुख नेतेच स्वतःच पक्षाच्या चिन्हावरील उमेदवाराला मत देऊ नका, असे सांगत असल्याने कार्यकर्त्यांपासून मतदारांपर्यंत सर्वांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे. या गोंधळावर राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी स्पष्टीकरण दिले आहे. ते म्हणाले, ज्योत्स्ना पाटील या मुळच्या भाजप नेते राजन पाटील यांच्या कार्यकर्त्या आहेत. शिवसेनेने त्यांना उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या सूचना दिल्या होत्या, मात्र त्यांनी त्या पाळल्या नाहीत. परिणामी, आघाडीचा धर्म राखण्यासाठी शिंदेंनी प्रगती दगडे यांना अधिकृत पाठिंबा जाहीर केला.

## तारिणीमध्ये रंगणार कॅबिनेट मंत्र्यांची खास मुलाखत

लोकप्रिय मालिका तारिणीमध्ये प्रेक्षकांना लवकरच एक वेगळ आणि रंजक वळण पाहायला मिळणार आहे. कौशिकीच्या MNN या न्यूज चॅनेलवर गाजत असलेल्या थेट भेट या कार्यक्रमात एका खास मुलाखतीचा थरार रंगणार आहे.

या कार्यक्रमात राजकारणी आणि सिनेस्टार्सची थेट मुलाखत घेतली जाते.याच कार्यक्रमात कॅबिनेट मंत्री बापुराव जामखंडी यांची खास मुलाखत घेण्यात येणार आहे.



ही मुलाखत नेहमीप्रमाणे कौशिकी घेणार हे निश्चित होत, पण कामाचा जास्त ताणामुळे ती अचानक बेशुद्ध पडते. त्यामुळे सेटवर एकच गोंधळ उडतो, आता ही महत्त्वाची मुलाखत कोण घेणार, असा प्रश्न सगळ्यांसमोर उभा आहे. याच वेळी दयानंद सुचवतात की ही मुलाखत केदारने घ्यावी.

आता केदार एका पत्रकाराप्रमाणे मंत्री महोदयांची सर्व माहिती गोळा करतोय. मुलाखतीदरम्यान केदार एक सर्वसामान्य माणूस म्हणून त्यांना प्रश्न विचारतो. तो बापुराव जामखंडी यांच्या आयुष्याचा, संघर्षाचा आणि राजकीय प्रवासाचा सखोल आढावा घेतो. या मुलाखतीसाठी केदारला कौशिकीचा नवरा शेखर मदत करतो. ही मुलाखत प्रेक्षकांना खूप भावते आणि सोशल मीडियावर ती मोठ्या प्रमाणात व्हायरल ही होते. कॅबिनेट मंत्री बापुराव जामखंडी यांची भूमिका ज्येष्ठ अभिनेते अनंत जोग साकारणार आहेत.

त्यांची व्यक्तिरेखा थेट, स्पष्टवक्ती आणि प्रभावी आहे.ज्यामुळे कथेला आणखी वेगळं वळण मिळणार आहे.ही व्हायरल मुलाखत पुढे काय परिणाम घडवणार? हे जाणून घेण्यासाठी पाहायला विसरू नका तारिणी, दररोज रात्री ९:३० वा. फक्त आपल्या झी मराठीवर. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# अमरावतीला आज मिळणार नवा महापौर

- महापौर निवड औपचारिक, उपमहापौरपदासाठी राजकीय खेळी सुरू
- महायुतीला महापौरपद निश्चित; काँग्रेस-बसपाची रणनिती



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 5) -** महानगर पालिकेच्या सत्तास्थापनेनंतर आज शहराला नवा महापौर मिळणार असून, महापौरपदाची निवड जवळपास निश्चित मानली जात आहे. मात्र उपमहापौरपदासाठी राजकीय चढाओढ आणि अंतर्गत असंतोषामुळे समीकरण अद्याप अस्पष्ट आहे. त्यामुळे 6 जानेवारी रोजीची आमसभा राजकीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

अमरावती महानगर पालिकेच्या निवडणुकीनंतर शहराच्या 17 व्या महापौरपदाची निवडणूक शुक्रवारी, (दि. 6) होणार आहे. महापालिकेच्या 22 प्रभागांतील 87 नगरसेवक संयुक्तपणे महापौर आणि उपमहापौरपदासाठी मतदान करणार आहेत. दुपारी 1 वाजता जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका सभागृहात विशेष बैठक आयोजित करण्यात आली असून प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली आहे. महापौरपदासाठी भाजपकडून श्रीचंद तेजवानी, काँग्रेसकडून डॉ. संजय शिरभाते, तर बसपाकडून इस्माइल कासम लालुवाले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

### महापालिकेतील पक्षीय स्थिती (एकूण 87 जागा)

| | |
|---|---|
| भाजप | - 25 |
| युवा स्वाभिमान पक्ष | - 15 |
| काँग्रेस | - 15 |
| राष्ट्रवादी काँग्रेस (अजित) | - 11 |
| शिवसेना (शिंदे) | - 03 |
| बसपा | - 03 |
| शिवसेना (उबाठा) | - 02 |
| वंचित बहुजन आघाडी | - 01 |

### काँग्रेस आणि बसपाची रणनिती

महायुतीच्या उमेदवारांना वॉकओव्हर न मिळाल्याने काँग्रेस आणि बसपानेही आपले उमेदवार निवडणुकीत उभे केले आहेत. महायुतीतील असंतुष्ट नगरसेवकांचा फायदा काँग्रेसला होतो की बसपाला, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### हात वर करून मतदान

निवडणूक प्रक्रियेनुसार प्रथम महापौरपदाच्या उमेदवारांची घोषणा केली जाईल. त्यानंतर अर्ज मागे घेण्यासाठी 15 मिनिटे दिली जातील. त्यानंतर उपस्थित नगरसेवक हात वर करून मतदान करतील.

उपमहापौरपदासाठी काँग्रेसकडून लुबना तनवीर, युवा स्वाभिमान पक्षाकडून सचिन भेंडे, तर बसपाकडून सचिन वैद्य यांनी अर्ज सादर केले आहेत.

### महापौर निवड औपचारिक, उपमहापौरपदावर पेच

महापालिका निवडणुकीतील तुटपुंज्या निकालानंतर भाजपने महायुती आघाडीच्या पाठिंब्यावर महापौरपदासाठी श्रीचंद तेजवानी यांचे नाव जाहीर केले आहे. महापौरपदासाठी 44 नगरसेवकांचे बहुमत आवश्यक असून, भाजप उमेदवाराला भाजपचे 25, युवा स्वाभिमान पक्षाचे 15, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित)चे 11 आणि शिवसेना शिंदे गटाचे 03 असे एकूण 54 नगरसेवकांचा पाठिंबा असल्याने महापौरपदाची निवड केवळ औपचारिक ठरण्याची शक्यता आहे. दरम्यान, उपमहापौरपदासाठी युवा स्वाभिमान पक्षाचे सचिन भेंडे यांच्या उमेदवारीवर महायुतीतील अंतर्गत मतभेद उफाळून आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित)च्या आमदार सुलभा खोडके यांनी उपमहापौरपदासाठी पाठिंबा देण्याबाबत विचार व्यक्त केल्याने युवा स्वाभिमान पक्षाची चिंता वाढली आहे.

# धक्कादायक! तब्बल 4 लाख गुरुजी नापास

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 5) -** शिक्षक पण शिकविण्यास पात्र असावे म्हणून राज्य शासनाने शिक्षक पात्रता परीक्षा घेणे सूरू केले आहे. विद्यार्थ्यांना घडविणारे शिक्षक वृंद पण 'तावून सुलाखून' निघणार असतील तर उत्तम. हा त्यामागचा हेतू शासनाने ठेवला.



पण बघतो तर काय, चक्क नापास झालेले अधिक निघाले, असा निकाल पुढे आला आहे. शिक्षकांची पात्रता ठरविणाऱ्या महा टीईटी 2025 चा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. हा निकाल शिक्षण क्षेत्रास चांगलाच धक्का देणारा ठरत असल्याची शैक्षणिक वर्तुळ प्रतिक्रिया देत आहे.

राज्यात मोठ्या संख्येने शिक्षक पात्र होण्यास इच्छुक उमेदवारांनी ही परीक्षा दिली होती. केवळ 11 टक्के उमेदवार उत्तीर्ण झाले आहे. म्हणजे 3 लाख 96 हजार पेक्षा अधिक उमेदवार विद्यार्थी नापास झाल्याची ही आकडेवारी आहे. आता जर गुरुजी हेच या मोठ्या प्रमाणात नापास होत आहे, तर गुणवत्ता कशी सिद्ध करणार, असा प्रश्न उपस्थित केल्या जाऊ लागला आहे. उद्याची पिढी घडविणाऱ्या शिक्षकांची पात्रता ठरविणाऱ्या महा टीईटी परीक्षेत हे आता दिसून आले आहे. गुरुजी वर्ग जर असे लाखात नापास असतील, तर मुलं घडणार कसे, असा प्रश्न.

इयत्ता पहिली ते पाचवीसाठी असलेल्या पेपर एक मध्ये 2 लाखा पेक्षा अधिक उमेदवार यांनी नोंदणी केली होती. जाहीर करण्यात आलेल्या निकालात माध्यम निहाय आणि विषय निहाय यात मोठे अंतर असल्याचे निरीक्षण आहे. कन्नड माध्यमाचा निकाल अती उत्तम तुलनेने चांगला लागला आहे. या विषयात 15 टक्के वर निकाल असल्याची नोंद झाली आहे.

मराठी, हिंदी व तेलगू माध्यमाचा निकाल जेमतेम सरासरी आसपास आहे. तर उर्दू, इंग्रजी व प्रामुख्याने गुजराती माध्यमातील निकालाची टक्के वारी अत्यंत कमी असल्याचे निकाल सांगतो. गणित, विज्ञान व सामाजिक विज्ञान या विषयात अपेक्षा होती त्यापेक्षा कमी निकाल लागला आहे. उपस्थित उमेदवारपैकी केवळ 11. 47 टक्केच उमेदवार उत्तीर्ण झाले. पेपर दोन मध्ये म्हणजे इयत्ता सहावी ते आठवी साठी घेण्यात आलेल्या परीक्षेत तर वेगळी स्थिती दिसून आली नाही. या परीक्षेत पण निकाल 11. 12 टक्के असा मर्यादित राहिल्याची नोंद पुढे आली आहे.

राज्य परीक्षा परिषदेकडून जाहीर करण्यात आलेली माहिती अशी. एकूण 4 लाख 75 हजार 669 उमेदवारांनी या महा टीईटी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यात 4 लाख 46 हजार 730 उमेदवार विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षा देण्यास उपस्थित झाले होते. म्हणजे 28 हजार 938 विद्यार्थी हे गैरहजर राहले, अशी आकडेवारी आहे. अंतिम निकाल लागला. त्यात फक्त 50 हजार 369 उमेदवार विद्यार्थी पात्र ठरले. आणि उर्वरित 3 लाख 96 हजार 325 उमेदवार नापास म्हणजे अनुतीर्ण झाले आहेत. पेपर 1 व पेपर 2 या दोन्ही पातळी वर नापास होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. हीच बाब चिंतेची समजल्या जात आहे.

# पोलिसांची अवैध गोवंश वाहतुकीवर कारवाई

**चांदूर रेल्वे, (दि. 5)-** 5 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी चांदूर रेल्वे पोलीस नियमित गस्त घालत असताना ग्राम धानोरा माली परिसरात दोन व्यक्ती संशयास्पदरीत्या 6 जनावरांसह आढळून आल्या. चौकशी केली असता ही जनावरे कतलीसाठी अवैधरित्या वाहतूक केली जात असल्याचे उघड झाले. याप्रकरणी गजानन रामराव राठोड (वय 49, रा. धानोरा मोगल) आणि गोपाल आत्माराम वानखडे (वय 42, रा. कंजरा, ता. नांदगाव खंडेश्वर) यांना ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई चांदूर रेल्वे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार रवि भुताडे व त्यांच्या पथकाने केली. संबंधित आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू असून पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करीत आहेत.




# एसटी बस चालकावर हल्ला करणाऱ्या आठ आरोपींना शिक्षा

**सरकारी कामात अडथळा, सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 5)-** एसटी बस चालकावर हल्ला करून सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी आठ आरोपींना दोषी ठरवित वरुड येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय (क्रमांक 01) यांनी शिक्षा सुनावली आहे. 4 फेब्रुवारी रोजी हा निकाल देण्यात आला. फिर्यादी अजरुद्दीन निजामुद्दीन शेख (27, रा. वर्धमान नगर, नागपूर) हे एसटी महामंडळातील कर्मचारी असून आहेत. 3 नोव्हेंबर 2016 रोजी ते त्यांची एसटी बस नागपूर-अमरावती-मोर्शी-वरुड मार्गावर प्रवाशांसह नेत असताना हिवरखेड-उमरखेड बसस्टॉपजवळ हा प्रकार घडला.

बस मोटरसायकलला ओव्हरटेक करत असताना समोरून येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या तवेरा चालकाने बसला कट मारला. त्यानंतर खडका फाट्याजवळ सदर तवेरा गाडी बससमोर आडवी लावून अडविण्यात आली. त्यानंतर गाडीतून उतरलेल्या आठ जणांनी बसचा घेराव घालत चालक अझरुद्दीन शेख यांच्यावर हल्ला केला.

आरोपींनी हाताबुक्क्यांनी मारहाण केली, केस ओढून स्टेरिंगवरून खाली खेचण्याचा प्रयत्न केला. तसेच एका आरोपीने लोखंडी रॉडने बसचे दोन्ही इंडिकेटर फोडून व केबिनच्या दरवाज्याचे नुकसान करत सुमारे 1,000 रुपयांची तोडफोड केली. या प्रकरणी बेनोडा पोलिस ठाण्यात आरोपींविरुध्द भादंवि कलम 353, 332, 341, 143, 147, 186 तसेच सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा कलम 3(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान नाकाबंदी करून लेहगाव येथे आरोपींना वाहनासह ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी तपास पूर्ण करून दोषारोपपत्र दाखल केले. न्यायालयात सरकारी अभियोक्ता यांनी आठ साक्षीदार तपासले. त्यानंतर दोन्ही पक्षाच्या युक्तीवादानंतर वरुड येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय (क्रमांक 01) यांनी आरोपी विशाल नारायण कुरवाडे (रा. परसोडा, ता. वरुड), मंगेश सुभाष ढोमणे, सिद्धार्थ राजेश वाहने, प्रवीण जनार्दन नासरे, सचिन कचरूजी शेंडे, नरेश उकंडराव सोमकुवर, प्रवीण बाबाराव शेंडे, सुनील सुभाष ढोमणे (सर्व रा. लिंगा, ता. वरुड, जि. अमरावती) यांना दोषी ठरवले.

# बिबट्याचा मुक्त संचार; विश्रामगृह परिसरात भीतीचे वातावरण

**महासागर प्रतिनिधी**

**चिखलदरा (दि. 5) -** निसर्गरम्य पर्यटनस्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिखलदरा येथील विश्रामगृह परिसरात बिबट्याचा वावर आढळून आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकीय विश्राम भवनाच्या परिसरात बिबट्या फिरताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाला असून, हा प्रकार 3 फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे 11.40 सुमारास घडला. सीसीटीव्ही फुटेजनुसार, भूक भागवण्यासाठी बिबट्या विश्राम भवनाच्या आवारात काही वेळ मुक्तपणे संचार करताना दिसून येतो. शांतपणे परिसराची पाहणी केल्यानंतर त्याने तेथील एका कुत्र्याच्या लहान पिल्लावर झडप घालून ते पकडल्याचे दृश्यही कॅमेऱ्यात नोंदले गेले आहे. त्यानंतर बिबट्या त्या पिल्लाला घेऊन जंगलाच्या दिशेने पलायन करताना दिसतो. या घटनेमुळे शासकीय विश्राम भवनात वास्तव्यास असलेले कर्मचारी, पर्यटक तसेच आसपासच्या वस्त्यांमध्ये राहणारे नागरिक प्रचंड दहशतीखाली आले आहेत.

चिखलदरा परिसर जंगलालगत असल्याने यापूर्वीही वन्यप्राण्यांचा वावर आढळून आला आहे; मात्र, थेट वस्ती व शासकीय इमारतींच्या परिसरात बिबट्याचा मुक्त संचार झाल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. विशेषत: रात्रीच्या वेळी नागरिकांनी घराबाहेर न पडण्याचे आवाहन करण्यात येत असून, पालकांमध्ये लहान मुलांच्या सुरक्षिततेबाबत चिंता वाढली आहे.

स्थानिक नागरिकांकडून वनविभाग व संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी तातडीने दखल घेऊन योग्य ती उपाययोजना करावी, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे. बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी पिंजरा लावणे, परिसरात गस्त वाढवणे तसेच नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. दरम्यान, या घटनेमुळे पर्यटनस्थळ असलेल्या चिखलदऱ्यात येणाऱ्या पर्यटकांमध्येही भीतीचे वातावरण पसरले असून, प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत, अशी अपेक्षा सर्व स्तरातून व्यक्त केली जात आहे.


**BID SCHEDULE (online)**

All bid related activities (Process) like Downloading of bid document, submission of bid and submission of EMD and other documents will be governed as per the time schedule given under Key Dates below: For Medical Equipment and instruments

| Sr. No. | Activity | Period |
|---|---|---|
| 1. | Period of sale of Tender document/Download | From 05/01/2026. |
| 2. | Date for Submission of Queries | Before Pre-bid meeting |
| 3. | Date of pre-bid meeting | 07/02/2026. 12.00 Noon |
| 4. | Dates for uploading tender document | From 05/02/2026., 10.00 A.M. to 12/02/2026. up to 05.00 P.M. |
| 5. | Last date and time for submission of tender | 12.02.2026 05:00PM |
| 6. | Date and time of openingof Envelope No.1 | 13.02.2026 05:05PM |

| | |
|---|---|
| Address for communication | The Medical Superintendent Regional Referral Service Hospital Amravati |
| Website | https://mahntenders.gov.in |

A complete set of tender documents may be purchased by interested eligible bidder by online payment of a non-refundable fee ("Bid/Tender Fee"). Bidder has to pay online payment of bid fee by RTGS/NEFT to the A/c of " Officer on special duty, Regional Referral Service Hospital Amravati" as per the table given and within time as per schedule.

As per Govt. Resolution by Industries, Energy & Labour Department, Maharashtra State, dated 1.12.2016 Entities who are registered under Micro, Small and Medium Enterprises Development Act, 2006 are exempted from paying Tender Form Fees and Earnest Money Deposits.

The bidders shall be rejected summarily upon failure to follow procedure prescribed in the bid document. The conditional bid shall be rejected.

The Medical Superintendent, Regional Referral Service Hospital Amravati, reserves all the rights regarding this bid document and procedure.

वि.मा.का./अम. / जाहि / १०१६ /२०२५-२०२६

Sd/-
Medical Superintendent
Regional Referral Service Hospital
Amravati


# इयत्ता 10 वी व 12 वीच्या परीक्षेसाठी 'कॉपीमुक्त' अभियानावर भर

## प्रशासन सज्ज

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.5) -** जिल्ह्यात आगामी 10 वी आणि 12 वीच्या बोर्ड परीक्षा अत्यंत शिस्तबद्ध, पारदर्शक आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली. सन 2025-26 शैक्षणिक वर्षातील 12 वीची परीक्षा 10 फेब्रुवारीपासून तर 10 वीची परीक्षा 20 फेब्रुवारीपासून सुरू होत आहे. परीक्षेच्या काळात कॉपीचे प्रकार रोखण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष दक्षता समितीची स्थापना करण्यात आली असून तिची पहिली बैठक संपन्न झाली आहे.



यावर्षी अमरावती जिल्ह्यातून 10 वीसाठी 187 केंद्रांवर 28 हजार 531 विद्यार्थी, तर 12 वीसाठी 137 केंद्रांवर 39 हजार 934 विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. जिल्हयातील एकूण केंद्रांपैकी 85 टक्के केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर राहणार आहे. विशेषत: जिल्ह्यातील 34 उपद्रवी आणि 43 संवेदनक्षम केंद्रांवर प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केले असून, तिथे केंद्रप्रमुख आणि पर्यवेक्षकांची अदलाबदल करण्याचे आदेश राज्य मंडळाने दिले आहेत.

यासंदर्भात जिल्हाधिकारी येरेकर यांनी विविध विभागांना सूचना दिल्या आहेत. परीक्षा काळात खंडित वीज पुरवठ्याची समस्या उद्भवू नये यासाठी महावितरणला सतर्क राहण्यास सांगितले आहे. विद्यार्थ्यांना वेळेवर केंद्रावर पोहोचता यावे यासाठी परिवहन मंडळाने जादा बसचे नियोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रत्येक परीक्षा केंद्रावर पोलिसांचा चोख बंदोबस्त असणार असून महसूल विभागाची विशेष भरारी पथकेही कार्यरत राहतील. पंचायत समिती स्तरावरील वर्ग-1 आणि वर्ग-2 च्या अधिकाऱ्यांची नियुक्ती या पथकांमध्ये केली जाणार आहे.

परीक्षेचे गांभीर्य राखण्यासाठी केवळ प्रशासकीय तयारीच नाही, तर विद्यार्थी आणि पालकांमध्ये जनजागृती करण्यासाठी शपथ देखील देण्यात आली आहे. 'कॉपीमुक्त' आणि 'भयमुक्त' वातावरणात प्रत्येक विद्यार्थ्यांला आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळावी, हाच या नियोजनाचा मुख्य उद्देश असल्याचे येरेकर यांनी सांगितले.

सर्व शिक्षक, संस्थाचालक आणि पालकांनी या परीक्षा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे आणि विद्यार्थ्यांनी कोणत्याही दडपणाशिवाय अभ्यासावर लक्ष केंद्रित करून परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहन जिल्हाधिकारी येरेकर यांनी केले आहे.


**ग्रामपंचायत कार्यालय झटामझिरी**

**पंचायत समिती ता. वरूड जि. अमरावती**

**निविदा सुचना ००२६-२७**

ग्रामपंचायत कार्यालय झटामझिरी ता. वरूड जि. अमरावती यांचे मार्फत अंतर्गत खालील कामाची मोहरबंद निविदा ब-१ टक्केवारी प्रपत्रामध्ये बांधकाम विभाग यांचे वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा सरपंच/सचिव ग्रामपंचायत कार्यालय झटामझिरी कडून देण्यात येतील.


| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत | अनामत रक्कम | निविदा फी | निविदा प्रसिद्धी | निविदा विक्री प्रारंभ | निविदा विक्री समाप्त/ निविदा सादर करणे | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनूसूचित जाती आणि नवबौद्ध वस्ती वॉर्ड क्र. ३ मध्ये पेव्हींग ब्लॉक परिसरात बसविणे | ४,००,०००/- | १ % | ५००/- | ०६.०२. २०२६ कार्यालयीन वेळेत | ०६.०२. २०२६ कार्यालयीन वेळेत | १२.०२.२०२६ कार्यालयीन वेळेत | १३.०२.२०२६ कार्यालयीन वेळेत |

टिप :-१. निविदेच्या अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालय येथे पाहण्यास मिळेल.

२. बयाणा रक्कम नगदी स्वरूपात/डीडी द्वारे/ एफडीआर द्वारे स्वीकारण्यात येईल.

**सरपंच/सचिव**
**ग्रामपंचायत झटामझिरी**
**ता. वरूडर जि.अमरावती.**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताने महाराष्ट्र सुन्न असतानाच, आता या अपघाताबाबत नवनवीन माहिती समोर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विमानात नक्की काय घडलं? कशा प्रकारे ही दुर्घटना झाली? याबाबत आमच्याकडे काही माहिती आली असून, ९ फेब्रुवारीनंतर मी यावर स्पष्टपणे भाष्य करणार आहे, असे आमदार रोहित पवार यांनी सांगितले. त्यांच्या या वक्तव्याने नवा ट्विस्ट निर्माण झाला आहे.



# नवा ट्विस्ट!

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी मुंबईहून बारामतीला येत असताना विमान अपघातात निधन झाले. रोहित पवार म्हणाले की, एखादी मोठी घटना घडल्यानंतर नेमकं सत्य काय आहे, हे लोकांसमोर येणं महत्त्वाचं असतं. आमच्याकडे काही प्राथमिक माहिती आली आहे, आम्ही आणखी माहिती मागवत आहोत. ९ तारखेनंतर सर्व काही स्पष्टपणे मांडले जाईल. त्यांच्या या वक्तव्यामुळे अपघातामागे तांत्रिक कारणांव्यतिरिक्त इतर काही गोष्टी होत्या का? अशी चर्चा आता सुरू झाली आहे.

दुसरीकडे, अजित पवार यांच्या अपघाती विमान दुर्घटनेनंतर तपास यंत्रणांनी आता निर्णायक टप्प्यात प्रवेश केला आहे. या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा पुरावा मानला जाणारा ब्लॅक बॉक्स अखेर तांत्रिक पातळीवर तपासासाठी सक्रिय करण्यात आला असून त्यातील माहिती रिकव्हर करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

या घडामोडीमुळे अपघाताच्या नेमक्या कारणांबाबत स्पष्ट चित्र समोर येण्याची शक्यता वाढली आहे. तपास यंत्रणांकडून अत्यंत दक्षतेने आणि प्रोटोकॉलनुसार ही प्रक्रिया राबवली जात असल्याची माहिती समोर येत आहे.

विमान अपघातानंतर घटनास्थळावरून मिळालेल्या अवशेषांमध्ये ब्लॅक बॉक्स सुरक्षित अवस्थेत सापडल्याने तपासाला मोठी दिशा मिळाली होती. मात्र, त्यातील डेटा उघडणे ही अत्यंत संवेदनशील आणि तांत्रिक प्रक्रिया असल्याने ती विशेष तज्ज्ञांच्या देखरेखीखाली सुरू करण्यात आली आहे.

ब्लॅक बॉक्समध्ये विमानाच्या उड्डाणादरम्यानची सर्व तांत्रिक माहिती, इंजिनची स्थिती, पायलट आणि कंट्रोल रूममधील संवाद, तसेच शेवटच्या क्षणांतील नोंदी साठवलेल्या असतात. त्यामुळे या डेटाचे विश्लेषण अपघाताच्या मूळ कारणांचा शोध घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

दरम्यान, महाराष्ट्र सरकारने या प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे (सीआयडी) सोपवला आहे. केंद्राच्या अअवक्ष विभागाने ब्लॅक बॉक्स जप्त केला आहे. यातील माहितीवरून अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होईल. कंपनीच्या मालकांवर कडक कारवाई होण्याची दाट शक्यता आहे.

तपास अधिकाऱ्यांच्या मते, ब्लॅक बॉक्समधील माहिती व्यवस्थितरीत्या मिळवण्यासाठी विशेष प्रयोगशाळेत उच्च तांत्रिक साधनांचा वापर केला जात आहे. डेटा खराब झालेला नसल्याची प्राथमिक खात्री मिळाल्यानंतरच रिकव्हरीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या प्रक्रियेदरम्यान प्रत्येक टप्प्यावर काळजी घेतली जात असून, कोणतीही माहिती नष्ट होऊ नये यासाठी विशेष खबरदारी बाळगली जात आहे. संबंधित तज्ज्ञांची टीम या कामात गुंतलेली आहे.

या अपघाताने संपूर्ण राज्याला हादरवून सोडले होते. अजित पवार यांच्यासह विमानातील अन्य प्रवाशांचा मृत्यू झाल्यानंतर अपघाताची नेमकी कारणे काय होती, याबाबत विविध तर्कवितर्क लावले जात होते. हवामानातील बदल, तांत्रिक बिघाड, लँडिंगदरम्यानची अडचण अशा अनेक शक्यतांवर चर्चा होत होती. मात्र, आता ब्लॅक बॉक्समधील अधिकृत माहिती समोर आल्यानंतरच या सर्व प्रश्नांची शास्त्रीय उत्तरे मिळू शकणार आहेत.

तपास यंत्रणांकडून या प्रकरणाकडे अत्यंत गांभीर्याने पाहिले जात आहे. ब्लॅक बॉक्समधील माहितीचे विश्लेषण झाल्यानंतर एक सविस्तर अहवाल तयार केला जाणार आहे. या अहवालाच्या आधारे पुढील कायदेशीर आणि तांत्रिक निर्णय घेतले जाणार असल्याचे समजते. अपघातास कारणीभूत ठरलेल्या घटकांबाबत स्पष्टता आल्यास भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना आखण्यासही मदत होणार आहे.

दरम्यान, अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यात निर्माण झालेल्या भावनिक वातावरणात या तपासाची सर्वांनाच उत्सुकता आहे. त्यांच्या कुटुंबीयांसह कार्यकर्ते आणि नागरिकांना अपघाताचे नेमके कारण समजावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

ब्लॅक बॉक्समधील माहिती या अपेक्षांना काही प्रमाणात उत्तर देऊ शकेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. ब्लॅक बॉक्स डेटा रिकव्हरीची प्रक्रिया सुरू झाल्याने तपासात नवे वळण आले आहे. आता सर्वांचे लक्ष या प्रक्रियेच्या निष्कर्षांकडे लागले आहे. अधिकृतरीत्या निष्कर्ष जाहीर झाल्यानंतरच अपघाताचे खरे कारण समोर येईल, मात्र सध्या सुरू असलेली ही तांत्रिक तपासणी या संपूर्ण प्रकरणातील सर्वात महत्त्वाची पायरी मानली जात आहे.

एसआर व्हेंचर्स कंपनी आंतरराष्ट्रीय स्तरावर आधीच ब्लॅकलिस्ट

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताने संपूर्ण देश हादरलेला असतानाच, या प्रकरणातील विमान कंपनी 'व्हीएसआर व्हेंचर्स' बाबत एक अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे.

युरोपियन हवाई नियामक संस्था EASA ने या कंपनीची 'थर्ड कंट्री ऑपरेटर' (TCO) अधिकृतता एक वर्षापूर्वीच निलंबित केली होती. सुरक्षेच्या अत्यंत गंभीर त्रुटी आणि तपासात असहकार्य केल्यामुळे ही कारवाई करण्यात आली होती, तरीही ही कंपनी भारतात सेवा कशी देत होती, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

# ३६ तासांच्या कोंडीत अडकलेली सरकारी (अ) संवेदनशीलता

मुंबई - पुणे द्रुतगती मार्ग म्हणजे महाराष्ट्राच्या विकासाची दोन इंजिनं जोडणारा 'हायस्पीड' दुवा; अशी बिरुदावली गेली अनेक वर्षे आपण ऐकत आलो आहोत. मात्र, या 'स्मार्ट' हायवेवर एका गॅस टँकरच्या अपघातामुळे तब्बल ३६ तास वाहतूक ठप्प होते आणि हजारो प्रवाशांना रस्त्यावरच नरकयातना भोगाव्या लागतात, तेव्हा या विकासाच्या गप्पा किती पोकळ आहेत, हे पुन्हा अधोरेखित होते.

मंगळवारी घडलेल्या या घटनेने प्रशासनाचा 'थर्ड क्लास' कारभार चव्हाट्यावर आणला आहे. गॅस गळती रोखण्यात आणि रस्ता मोकळा करण्यात यंत्रणेला दीड दिवस लागावा, हे प्रशासनाच्या नाकर्तेपणाचे आणि नियोजनाच्या दिवाळखोरीचे लक्षण आहे.





दिपक कैतके
मुंबई.

या भयंकर दिरंगाईमुळे वाहनचालक, लहान मुले आणि विशेषतः महिलांचे जे हाल झाले, त्याला जबाबदार कोण? केवळ टोलनाक्यावर वसुलीसाठी तत्पर असणारे पोलिस आणि प्रशासनाला अडकलेल्या प्रवाशांच्या वेदनांची काहीच किंमत उरलेली नाही का, हा सवाल आता संपूर्ण महाराष्ट्रातून विचारला जात आहे.

अपघात झाल्यानंतर सुरक्षेसाठी वाहतूक थांबवणे योग्य होते, यात दुमत नाही. पण ती पूर्ववत करण्यासाठी कोणताही 'कृती आराखडा' (Action Plan) सरकारकडे तयार नसावा, हे दुर्दैवी आहे. भर उन्हात आणि रात्रीच्या गडद अंधारात लाखो लोक उपाशी-तापाशी गाडीत खितपत पडले होते.

यात सर्वात लज्जास्पद आणि संतापजनक बाब म्हणजे महिलांची झालेली ससेहोलपट. नैसर्गिक विधीसाठी कोणतीही सोय नसताना महिलांनी ३६ तास काढले कसे असतील, याच्या कल्पनेनेही अंगावर काटा येतो. 'माता-भगिनीं'चा सन्मान करण्याच्या गप्पा मारणाऱ्या सरकारला आणि प्रशासनाला महामार्गावर आपत्कालीन परिस्थितीत साध्या फिरत्या शौचालयांची सोय करावीशी वाटली नाही, याहून मोठी शरमेची गोष्ट दुसरी कोणती असू शकते?

उलट, वाहतूक सुरू झाल्यावर ३६ तास जागून थकलेल्या आणि गाडीतच झोप लागलेल्या चालकांना माणुसकीने जागे करण्याऐवजी पोलिसांनी अरेरावी केल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. पोलिसांची ही 'खाकी' मस्ती आणि भूमिका अत्यंत असंवेदनशील होती.

रस्त्यावरची ही अनागोंदी पाहून सोशल मीडियावर सर्वसामान्यांच्या संतापाचा उद्रेक झाला, जो सरकारसाठी आरसा दाखवणारा आहे. अमित देसाईंसारख्या सजग नागरिकाने, फास्टॅग मधून पैसे सेकंदात कापले जातात, पण मदत मिळायला ३६ तास लागतात? हेच का तुमचे डिजिटल इंडिया? असा थेट सवाल केला आहे. तर प्रिया पाटील यांनी, एवढा मोठा एक्सप्रेसवे, पण आपत्कालीन परिस्थितीत महिलांसाठी एक फिरते टॉयलेट उपलब्ध करून देण्याची अक्कल प्रशासनाला नाही, अशा शब्दांत प्रशासनाचे वाभाडे काढले आहेत.

आम्ही कर भरतो, टोल भरतो, तरीही रस्त्यावर कुत्र्यासारखे हाल होतात, हा समीर शेख यांचा संताप प्रातिनिधिक आहे. सोशल मीडियावर ट्रेंड होणारे हॅशटॅग जनतेच्या मनातील असंतोष दर्शवत आहेत.

या सर्व प्रकारावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलेले भाष्य हे या असंतोषाला वाचा फोडणारे आहे. रस्ते बांधणे आणि फक्त टोल वसूल करणे इतकेच सरकारचे काम आहे का? अर्थसंकल्पात बुलेट ट्रेनच्या गप्पा मारण्याआधी सध्याचे रस्ते सुधारा, हा त्यांचा सल्ला राज्यकर्त्यांनी गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

३६ तास वाहतूक ठप्प असताना ज्या प्रवाशांकडून टोल वसूल केला गेला, तो त्यांना परत करण्याची मागणी तांत्रिकदृष्ट्या कठीण असली तरी, नैतिकदृष्ट्या योग्यच आहे. दुसरीकडे, हे सरकार फक्त खोके आणि सत्तेच्या साठमारीत मग्न आहे, हा अंबादास दानवे यांचा आरोपही परिस्थिती पाहता चुकीचा ठरवता येत नाही. राज्याला पालकमंत्री आहेत की नाहीत आणि ३६ तास रस्ता बंद पडतो तेव्हा एकही जबाबदार मंत्री घटनास्थळी का फिरकत नाही, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

एकीकडे प्रशासन गॅस गळतीचे तांत्रिक कारण पुढे करत आपली कातडी वाचवण्याचा प्रयत्न करत आहे, तर दुसरीकडे ३६ तासंच्या कोंडीने प्रवाशांचा संयम तोडला आहे. हा केवळ अपघात नव्हता, तर हे नियोजनाचे अपयश होते. टोलवसुलीत 'हायस्पीड' आणि मदतीत 'स्लो मोशन' असा हा कारभार यापुढे खपवून घेतला जाणार नाही. आता तरी हे 'टोल-सम्राट' सरकार जागे होणार की आणखी बळींची वाट पाहणार, हाच खरा प्रश्न आहे.

■ ■ ■

# गानकोकिळा भारतरत्न लता मंगेशकर

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांचा आज चौथा स्मृतिदिन. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती.

लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले.

हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती.

त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकरांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली.

१९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले.



१९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो.......

हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली.

मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले.

१९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम एस सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे.

फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला.

कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली.

लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. ६ फेब्रुवारी २०२२ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले.

लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही.

जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# झपाटलेपण असावं तर असं....

(कालच्या अंकावरून पुढे)

किती तरी लहान मोठ्या नद्या, ओढे पार करीत आणि जंगले तुडवीत बावगे यांनी ऐन तारुण्यात आपली साहसी स्वभावाची ओळख पटवून दिली. मराठवाड्यातील माधव बावगे व प्रा. नागनाथ स्वामी यांनी 'पंजाब सद्भाव व एकता यात्रेत' सहभागी होऊन आपल्या साहसीवृत्तीचे आगळे वेगळे दर्शन घडवून दिले होते. या यात्रेत त्यांनी पंजाबच्या पंचवीस गावात सद्भाव निर्माण करण्याच्या दृष्टीने मौलिक कार्य केले.

गुजरातमधील केवडिया येथे दि. २७ ते ३१ ऑक्टोबर १९८७ मध्ये विशाल राष्ट्रीय युवा शिबिराच्या पूर्वतयारी कॅम्पमध्ये श्री. बावगे यांनी सहभागी होऊन सर्वांची मने जिंकली.

औरंगाबादमधील एकात्मता शिबिराचे संयोजन करण्यात बावगे यांचा सिंहाचा वाटा होता. भारत ज्ञान-विज्ञान जथ्था, साक्षरता अभियानात मुख्य समन्वयकाची भूमिका त्यांनी यशस्वीरीत्या पार पाडली. संपूर्ण लातूर जिल्ह्यात साक्षरतेसंबंधीची जाणीव - जागृती घडविण्यात त्यांनी प्रशंसनीय कामगिरी केली.

बावगे यांनी आपला कार्यालयीन व्याप सांभाळून छात्रभारतीचे जिल्हाध्यक्ष म्हणून, राजर्षी शाहू बॅडमिंटन क्लबचे सेक्रेटरी म्हणून, तानाजी क्रीडा मंडळाचे कोषाध्यक्ष, सर्वांगीण विकास मंडळाचे उपाध्यक्ष, समाज भारतीचे कोषाध्यक्ष या विविध नात्याने आपले कार्य केले. राष्ट्रीय व सामाजिक प्रश्नाची जाण असणाऱ्या माधव बावगे यांनी एका मुलानंतर ऑपरेशन करवून घेतले. एकूणच बावगे यांच्या रोमारोमात देशप्रेमाची उत्कट भावना असल्याचे जाणवते.

विद्यार्थीदशेपासून ते आजपर्यंतचा बावगेंचा जीवनक्रम म्हणजे जणू साहसाची गाथाच आहे. सतत पंधरा-पंधरा, अठरा अठरा तास काम करूनही बावगे यांना थकवा येत नाही. अथक काम करीत राहणे, आव्हानात्मक कार्यात स्वतःला गुंतवून घेणे, रचनात्मक कार्यात योगदान देणे, विद्यार्थ्यांना पुरोगामी विचारांचे वळण देणे यासारख्या कार्यात बावगे सतत व्यस्त असतात.

**राष्ट्रीय युवा पुरस्कारासाठी निवड :**

माधव बावगे यांची राष्ट्रीय युवा पुरस्कारासाठी झालेली निवड ही सर्वार्थाने सार्थ असल्याची जाणीव प्रत्येकाला झाल्याशिवाय राहत नाही. पंतप्रधान चंद्रशेखर यांच्या हस्ते इंदिरा गांधी स्टेडियमवर माधव बावगे यांना 'राष्ट्रीय युवा पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. याचा मराठवाड्यातील व महाराष्ट्रातील युवकास सार्थ अभिमान वाटला.

महाराष्ट्रातून या पुरस्कारासाठी माधव बावगे या सानेगुरुजींच्या धडपडणाऱ्या एकमेव युवकाची निवड व्हावी ही खरोखरच भूषणावह घटना ठरली.

ग्रामीण परिसरात जन्माला आलेले हे 'युवारत्न' आपल्या भावी आयुष्यात एकापेक्षा एक आव्हानात्मक व साहसी उपक्रमात सहभागी होऊन मराठवाड्याची, महाराष्ट्राची व देशाची मान उंचविण्यात अग्रेसर राहिले. माधव बावगेच्या रूपाने युवकांमधील सत्प्रवृत्तीचाच हा सन्मान होय. श्री. बावगेच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन कार्य करणारे दमदार युवक निर्माण होवोत, ही अपेक्षा.

**अंधश्रद्धा निर्मूलन कार्यातील योगदान :**

१९९० नंतर माधव बावगे यांनी अंधश्रध्दा निर्मूलन कायार्ला अग्रक्रम दिल्याचे दिसून येते. अंधश्रध्दा निर्मूलन कार्यात त्यांनी दिलेल्या मौलिक योगदानाचे फलित म्हणूनच ते बुवाबाजी विरुध्द संघर्ष विभागाचे महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे १९९६ पासून बरीच वर्ष राज्याचे कार्यवाह राहिले.

डॉ. सोमनाथ रोडे
लातूर
७५१७९८५६९०

भाग २

महाराष्ट्र अंनिस लातूर केंद्राच्या वतीने ७४ बुवा - बाबांचा भांडाफोड, भानामतीची ५५० हून अधिक प्रकरणे सोडविली, नरबळीची ३ प्रकरणे थांबविली, ५ ठिकाणच्या पशुहत्या रोखल्या आणि १२ पोतराजांना पोतराज प्रथेतून मुक्त केले.

अंधश्रध्दा निर्मूलन समिती जिल्हा लातूरचे ते जिल्हाध्यक्ष राहिले. तसेच माधव बावगे हे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रधान सचिव आणि त्यानंतर राज्याचे कार्याध्यक्षही झाले. त्यांची कार्याध्यक्षपदाची कारकीर्द संस्मरणीय ठरली. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या शाखांची संख्या ३५० च्या वर नेली. आतापर्यंत माधव बावगे व स्थानिक कार्यकर्त्यांच्या सहकार्याने लातूर जिल्हा अंनिसने सुमारे ४०० आंतरजातीय / आंतरधर्मिय सत्यशोधकी विवाह लावण्याचा उपक्रम पूर्णत्वाला नेला.

किल्लारी सास्तूरच्या भूकंपग्रस्तांचा आत्मविश्वास जागा करण्यासाठी व त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या वतीने निर्भय मानस मोहीम राबविण्यात मोलाचे योगदान दिले. डॉ. श्रीराम लागू, सिनेअभिनेते निळुभाऊ फुले आणि डॉ. नरेंद्र दाभोळकरांची व्याख्याने आयोजित करून बिथरलेल्या भूकंपग्रस्तांना मानसिक दिलासा दिला.

ग्रामीण भागातील करणी, भानामती, भूत-देवी अंगात येणे, भुताने झपाटणे इत्यादी प्रकरणे हाताळून त्यातील सत्यासत्यता लोकापुढे मांडून १०० पेक्षा अधिक प्रकरणे समुपदेशन करून सोडवली आहेत. वैज्ञानिक जाणीवा प्रशिक्षण शिबीरांच्या माध्यमातून आतापर्यंत ७३०० शिक्षकांना प्रशिक्षित करण्याचे श्रेय बावगे यांच्या निःस्पृह आणि संयमी नेतृत्वाकडे जाते, हे प्रांजळपणे कबूल केले पाहिजे. याशिवाय विज्ञान बोध वाहिनी, अंधश्रध्दा निर्मूलन स्वतंत्र कायद्यासाठी सतत पाठपुरावा करणे, राज्यव्यापी बुवाबाजी विरोधी संघर्ष व चमत्कार सत्यशोधन आवाहन यात्रा, राज्यस्तरावरील महिला जाहीरनामा परिषद, जादूटोणा, अघोरी व दुष्ट प्रथा यांचे समूळ उच्चाटन अधिनियम २००५ हे विधेयक त्वरीत पारीत व्हावे, ह्यासाठी डॉ. दाभोळकरासमवेत १० दिवस उपोषण अशा विविध कार्यक्रमात व उपक्रमात माधव बावगे यांनी समर्पितवृत्तीने दिलेले योगदान शब्दबध्द करण्यापलीकडील आहे.

महाराष्ट्रात अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीला उभारी यावी म्हणून धडपडणारे, झगडणारे, संघर्ष करणारे आणि झपाटलेले जे आघाडीचे शिलेदार आहेत, त्यातील एक अनमोल रत्न म्हणजेच माधव बावगे होय. श्रमर्षी बाबा आमटे द्वारा आयोजित श्रम संस्कार छावणीत १९७५ पासून आतापर्यंत सातत्याने सहभाग व शिबीर संयोजनात मोलाचे योगदान, राष्ट्रीय एकात्मतेसाठी आयोजित केलेल्या अरुणाचल प्रदेश ते ओखा (गुजरात) पर्यंतच्या दुसऱ्या भारत जोडो अभियानात १९८८-१९८९ मध्ये १५ राज्यातून ८१६० कि. मी. सायकलवरून प्रवास करून देशभर राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला आहे.

(क्रमशः)

■ ■ ■

## प्रसंग पाहोन चालावे

वाचक लिहितात

सध्या नवी दिल्ली येथे संसदेचे बजेट सत्र सुरू आहे. २ फेब्रुवारीला लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर चर्चा करणे अपेक्षित होते पण विरोधी पक्षनेते काँग्रेसचे राहुल गांधी यांनी अभिभाषणातील सूत्रांवर भाष्य न करता थेट भारत चीन सीमेवरील सुरक्षेचा प्रश्न उपस्थित केला. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधक ह्यांच्यात आरोप प्रत्यारोप होऊन गदारोळ झाला आणि त्यामुळे कामकाज स्थगित करावे लागले.

लोकसभा आणि राज्यसभा या सर्वोच्च व्यासपीठांवर राष्ट्रहिताशी निगडीत गंभीर आणि महत्त्वपूर्ण प्रश्नांवर सुसंस्कृत तसेच नियमबद्ध पद्धतीने चर्चा व्हायला हवी. तसे झाल्यास या महत्त्वपूर्ण व्यासपीठांचा सन्मान राखला जाऊ शकतो.

लोकशाहीत विरोधी पक्षाला प्रश्न विचारणे, सरकारला खडसावणे आणि राष्ट्रीय सुरक्षे सारख्या संवेदनशील विषयांवर स्पष्टीकरण मागण्याचा पूर्ण अधिकार आहे पण हे स्पष्टीकरण मागताना वेळ, पद्धत आणि संदर्भ हे संसदीय नियमांच्या चौकटीतच असायला हवे. राहुल गांधी स्वतःला हुशार समजतात पण प्रत्येक वेळी त्यांचे बेताल, बालिश आणि नियमबाह्य वर्तन यामुळे त्यांचे पितळ उघडे पडत आहे. राहुल गांधी ह्यांनी अप्रकाशित पुस्तकातील संदर्भ जोडून सूत्रे मांडली जी संसदेच्या नियमबाह्य असल्याची जाणीव लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांना करून द्यावी लागली आणि त्यांनी सदनाची मर्यादा ओलांडू नका असे सांगत राहुल गांधी यांना खाली बसवावे लागले पण राहून गांधी तीच सूत्रे मांडत होते.

संसद हे संघर्ष, मतभेद किंवा वादविवादाचे ठिकाण नव्हे तर ते संवादाचे व्यासपीठ असायला हवे. राष्ट्रहित, राष्ट्रीय सुरक्षा, संसदीय शिस्त आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांचे संतुलन राखायलाच हवे.

लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरात शिस्त पाळायलाच हवी. लोकप्रतिनिधींनी संयम आणि संवाद यांचे महत्त्व लक्षात घेऊन वर्तन करावे. संसदेचे कामकाज स्थगित झाल्याने देश आणि जनतेची हानी झाली. भारत चीन संबंध आधीच तणावपूर्ण असताना त्याविषयीचा उल्लेख संसदेत केल्याने भारताविषयी चुकीचा संदेश जाऊ शकतो हा विचार राहुल गांधी यांनी का केला नाही. राष्ट्रीय सुरक्षेवर चर्चा निश्चितच हवी पण ती नियमबाह्य झाल्यास देशासाठी धोकादायक ठरू शकते. राष्ट्राच्या सार्वभौमत्वशी निगडित निर्णय घेणाऱ्या संसदीय परंपरेला शोभणारे वर्तनच लोकप्रतिनिधी केल्यास ते देशहिताला पूरक ठरेल.

लोकशाहीचा गाभा ढासळू न दिल्यास यातूनच लोकशाही संस्थांची विश्वासार्थता वाढून देश बलशाली होऊ शकतो.

■ लीना मकरंद गाडगीळ, पनवेल.



## बेलाच्या पानांचे जबरदस्त फायदे

भगवान शंकराची पूजा करण्यासाठी बेलाच्या पानांचा अधिक वापर केला जातो. बहुतेक जण बेलपत्र फक्त धार्मिक विधींशी जोडतात, परंतु आयुर्वेद आणि पारंपारिक भारतीय पाककृतींमध्ये सुद्धा बेलाच्या पानांना खूप महत्त्व आहे. बेल वृक्ष धार्मिकदृष्ट्या पवित्र मानला जातो कारण ते औषधी गुणधर्मांनी समृद्ध आहे. त्याच्या पानांमध्ये आढळणारे नैसर्गिक संयुगे शरीराला थंड करण्यास, पचन सुधारण्यास, रक्तातील साखर संतुलित करण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, बेलपत्र विविध प्रकारे वापरले जाऊ शकते.

**बेलाच्या पानांचा हर्बल टी**

अनेकांना बेलाच्या पानांचा हर्बल टी आवडतो. या हर्बल टी ची चव चांगली असतेच त्याचबरोबर त्याचे अनेक आरोग्यदायी फायदेही आहेत. आयुर्वेद तज्ञ सांगतात की हे हर्बल टी पचनासाठी खूप फायदेशीर मानले जाते. यासाठी पचनाची समस्या दूर करण्यासाठी सकाळी रिकाम्या पोटी हे हर्बल टी प्यावे. बेलाच्या पानांचा हर्बल टी बनवण्यासाठी ४ ते ५ ताजी बेलाची पाने धुवून घ्या. आता एक ग्लास पाण्यात ही पाने टाकून ५ ते ७ मिनिटे उकळवा. त्यानंतर तयार हर्बल टी मध्ये तुम्ही थोडे मध किंवा लिंबाचा रस मिक्स करून सेवन करू शकता. यामुळे पोटातील गॅस, अपचन आणि बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो.

बेलाच्या पानांपासून तयार चटणी चविष्ट आणि आरोग्यदायी दोन्ही आहे. तर चटणी बनवण्यासाठी बेलची पाने, धणे, पुदिन्याची पाने, आले, हिरव्या मिरच्या, लिंबाचा रस आणि थोडेसे खडे मीठ हे सर्व मिश्रण एकत्र करून वाटून घ्या. आता तयार चटणी योग्य प्रमाणातच खावी. ही चटणी खाल्ल्याने पचनसंस्था मजबूत होते, भूक वाढते आणि उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्यास मदत होते.

रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत असेल तर तुम्ही बेलाच्या पानांचा काढा बनवून प्या. तज्ञांचे म्हणणे आहे की बेलाच्या पानांमध्ये व्हिटॅमिन ए, सी, बी1, बी ६, कॅल्शियम, फायबर आणि पोटॅशियम असे अनेक पोषक घटक असतात, जे बदलत्या ऋतूंमध्ये सर्दी आणि फ्लूपासून संरक्षण करण्यास मदत करतात. तर हा काढा बनवण्यासाठी बेलपत्र, तुळस, काळी मिरी आणि आले हे सर्व गोष्टी अंदाजे पाण्यात टाकून उकळवा. पाणी अर्धे झाल्यावर गाळून घ्या. जर चव खूप कडू असेल तर तुम्ही थोडे मध मिक्स करून या काढ्याचे सेवन करा.

बेलाच्या पानांची पावडर देखील बनवू शकता आणि ही तयार पावडर बराच काळ साठवून ठेवता येते. तर बेलाच्या पानांची पावडर बनवण्यासाठी बेलाची पाने घ्या, ती कडक उन्हात वाळवा आणि नंतर बारीक पुड तयार करा. बेलाच्या पानांची पावडर उन्हाळ्यात वापरण्यासाठी उत्तम आहे. तसेच बेलाच्या पानांचा वापर शरीराला थंड ठेवण्यास मदत करते.

बेलची पाने डिटॉक्स वॉटर म्हणून देखील वापरली जाऊ शकतात. प्रथम, बेलची पाने रात्रभर पाण्याच्या बाटलीत टाकून ठेवा. सकाळी दिवसभर हे पाणी प्या. यामुळे शरीराला नैसर्गिक थंडावा मिळतो आणि विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत होते. गर्भवती महिलांनी बेलची पाने खाण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### स्वर सम्राज्ञी पुण्यस्मरण

आता सुर झाले लुप्त
कानी पडणार नाही
येतील नव गायिका
पण सर येणार नाही ..

शब्दात होते माधुर्य
भावना होतसे साकार
हृदयाला करती स्पर्श
नयनी आसवांची धार ..

प्रेम असो भक्ती असो
असो देशभक्ती गीत
भाव हृदयी भिडती
अदभूत गायन रीत ..

त्याग व कर्मपूजाचे प्रतिक
होत्या आमच्या लता ताई
आदर्श हा जीवनी उतरवू
खरी हीच श्रध्दांजली होई ..

# अमरावतीतील ‘मनरेगा’ची चार हजार कामे बंद

## 80 हजार मजुरांवर उपासमारीची वेळ

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 5)** – ‘मनरेगा’ योजनेचे कर्मचारी 27 जानेवारीपासून संपावर गेले आहेत. त्यामुळे पाच दिवसांत जिल्ह्यातील 4097 कामे बंद पडली, याचा किमान 80 हजार मजुरांना फटका बसला. मेळघाटातील 30 हजारांवर मजुरांच्या होळीचा बेरंग होत आहे, तर सामाजिक वनीकरणातील रोपवाटिका, रोपलागवड आदी कामे ठप्प पडली आहेत. या संपामुळे रोजगार हमी योजनेची सर्व कामे सध्या बंद आहेत. फेब्रुवारी महिना सुरू झाल्याने शेतातील कामे कमी झाली आहेत. अशा वेळी मजूर मोठ्या आशेने रोहयोच्या कामांकडे वळतात. मात्र, कर्मचाऱ्यांच्या संपामुळे मस्टर काढण्यापासून ते मोजणीपर्यंतची सर्व कामे थांबली आहेत. शिवाय मजुरांची मस्टर प्रदाने सुद्धा प्रलंबित आहेत.

चिखलदरा व धारणी तालुक्यांतील आदिवासी मजुरांना तातडीने मनरेगा योजनेचे काम उपलब्ध न झाल्यास स्थलांतर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही, अशी स्थिती आहे. संपामुळे वैयक्तिक लाभार्थी यांची कामे अर्धवट स्थितीत असून त्यांच्यामध्ये कमालीची अस्वस्थता निर्माण झाली आहे.



### रोपवाटिका सुकल्या, वृक्षलागवड प्रभावित

जिल्ह्यात मनरेगातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे सर्वाधिक फटका सामाजिक वनीकरण विभागाच्या रोपवाटिका व वृक्षलागवड कामांना बसला आहे. या ठिकाणी वृक्षलागवड कामांवर दररोज मजूर असणे आवश्यक आहे. मात्र संपामुळे मजुरांचे मस्टर निघत नाही. त्यामुळे मजुरांनी कामावर येणे बंद केले आहे. अशा परिस्थितीत रोपांचे व वृक्ष लागवडीचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

### 4097 कामांवरील 79,514 मजूर कमी

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत कंत्राटी कर्मचारी यांचा 23 जानेवारीपासून संप सुरू असून जिल्ह्यात दैनिक मजूर उपस्थिती 96222 व कामे 5998 सुरू होती व सद्य: स्थितीत 16518 मजूर कामांवर व फक्त 1901 कामे सुरू आहेत. त्यामुळे 4097 कामे प्रभावित झाल्याने 79,514 मजूर कमी झाले. त्यामुळे %मनरेगा% योजनेची स्थिती गंभीर झाली आहे.

### मेळघाटातील मजुरांवर उपासमारीची वेळ

मेळघाट आदिवासी मजुरांना मनरेगा योजनेच्या कामाव्यतिरिक्त उदरनिर्वाहाचे दुसरे कोणतेही साधन नाही. संपामुळे मनरेगा कामे ठप्प झाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. आदिवासी बांधवांचा होळी हा महत्त्वाचा सण एक महिन्यावर आलेला आहे. मात्र संपामुळे निघालेले मस्टर ऑनलाइन करून त्यांची प्रदाने करणे अद्याप प्रलंबित असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ उद्भवली आहे.

# नांदगावच्या स्वच्छता व आरोग्य सभापतींनी केली डंपिंग ग्राउंडची पाहणी

- कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्याचे निर्देश
- कायमस्वरूपी जागेचा प्रश्न निकाली काढण्याचा निर्धार

**महासागर प्रतिधिी**
**नांदगाव खंडेश्वर, (दि. 5)**– नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीच्या नवनियुक्त स्वच्छता व आरोग्य सभापती ज्योत्स्ना धवसे यांनी पदभार स्वीकारताच शहरातील स्वच्छतेशी संबंधित गंभीर समस्यांची दखल घेत डंपिंग ग्राउंडची तातडीने पाहणी केली. यावेळी त्यांनी तेथील कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने व तात्काळ विल्हेवाट लावण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

डंपिंग ग्राउंडच्या परिसरात वास्तव्यास असलेल्या नागरिकांना दुर्गंधी, आरोग्यविषयक त्रास किंवा कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी स्वच्छता विभागाने विशेष दक्षता घ्यावी, असे निर्देश देताना कचरा व्यवस्थापनात कोणतीही कसूर सहन केली जाणार नसल्याचा इशाराही सभापतींनी दिला. तसेच, कचऱ्यावर प्रक्रिया करणारी मशीन अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत असल्याने ती तातडीने दुरुस्त करून कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात आले.



नगरपंचायतीकडून गेल्या अनेक वर्षांपासून डंपिंग ग्राउंडच्या कायमस्वरूपी जागेचा प्रश्न प्रलंबित असून, तो अधिक काळ रेंगाळू दिला जाणार नाही. हा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी आपण स्वत: पुढाकार घेणार असल्याचे आश्वासन यावेळी ज्योत्स्ना धवसे यांनी दिले.

याशिवाय शहरातील प्रत्येक प्रभागात दररोज नियमित साफसफाई करण्यात यावी. येत्या महाशिवरात्री महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बसस्थानक परिसर तसेच चांदूर रेल्वे रोडलगत साचलेले सर्व शेणखत तात्काळ उचलून परिसरातील झाडेझुडपे तोडून संपूर्ण परिसर स्वच्छ करण्याचे निर्देश देण्यात आले. बसस्थानक परिसरात दररोज विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.

शहराच्या कोणत्याही भागात कचरा दिसू नये यासाठी सर्व सफाई कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे. यासंदर्भात अधिकाऱ्यांनी दररोज सफाई कर्मचाऱ्यांकडून अहवाल घेऊन तो थेट सभापतींकडे सादर करावा, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले. सभापतींच्या या तातडीच्या पाहणीमुळे आणि ठोस निर्णयांमुळे नांदगाव शहरातील स्वच्छता व्यवस्थेत लवकरच सकारात्मक बदल घडून येतील, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## 7 फेब्रुवारीपासून तीन दिवसीय ‘विचार वेध’ व्याख्यानमाला

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार, (दि. 5)**– दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्री संत गुलाबराव महाराज सार्वजनिक ग्रंथालय व वाचनालय तसेच श्री संत गुलाबराव महाराज सेवा संस्था, बोराळा (भक्तीधाम) यांच्या संयुक्त विद्यमाने 7 फेब्रुवारीपासून तीन दिवसीय ‘विचार वेध व्याख्यानमाला’ आयोजित करण्यात आली आहे. ही व्याख्यानमाला स्थानिक भक्तीधाम येथील श्री ज्ञानेश्वर माऊली सभागृहात पार पडणार असून दररोज सायंकाळी 6.30 वाजता व्याख्यानास सुरुवात होईल.

सांस्कृतिक व सामाजिक प्रबोधनाला चालना देणे, समाजमनात नवचैतन्य निर्माण करणे तसेच सकारात्मक व मूल्याधिष्ठित विचारांचे बीजारोपण करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. समाजातील ज्वलंत प्रश्नांवर विचारमंथन घडवून आणण्यासाठी यंदाही ही त्रिदिवसीय व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. शनिवार, 7 फेब्रुवारी रोजी ‘वारकरी संप्रदाय = एक विश्वधर्म’ या विषयावर ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज बंडगोर (सांगोला) पहिले पुष्प गुंफतील. रविवार, 8 फेब्रुवारी रोजी ‘संत साहित्य आणि संविधान मूल्ये’ या विषयावर ह.भ.प. श्यामसुंदर महाराज सोन्नर (बीड) मार्गदर्शन करतील. सोमवार, 9 फेब्रुवारी रोजी ‘विद्रोही तुकाराम’ या विषयावर ह.भ.प. डॉ. बालाजी जाधव (छत्रपती संभाजीनगर) तिसरे पुष्प सादर करतील. व्याख्यानपुष्पनिहाय अध्यक्ष म्हणून अनुक्रमे रविंद्र इंगोले, बाबासाहेब लंगोटे व प्रा. केशवराव ठाकरे हे लाभणार आहेत. विविध मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या व्याख्यानमालेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



## वाढोणा रामनाथ येथील जि.प. प्राथमिक शाळेत सांस्कृतिक महोत्सव

**महासागर प्रतिनिधी**
**नांदगाव खंडेश्वर(दि.5)**– वाढोणा रामनाथ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दिनांक 2 फेब्रुवारी 2026 रोजी वार्षिक सांस्कृतिक महोत्सव उत्साहात पार पडला. मुख्याध्यापक प्रमोद रामचंद्र सानप यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पारंपरिक नृत्य व देशभक्तीपर नाटिकांच्या माध्यमातून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमात सन 2025 मध्ये नवोदय विद्यालयात निवड झालेल्या चार विद्यार्थ्यांचा तसेच विविध शिष्यवृत्ती प्राप्त 16 विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या शिक्षिका मंगला अळसपुरे यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ माजी सैनिक घोटणे यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी पंकज आगरकर होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांनी लावणी, कोळी नृत्य, भारूड तसेच छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित नृत्यनाट्य सादर केले. चिमुकल्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून विशेष दाद मिळाली.

## काशीरावजी साबळे यांचे निधन

**मोर्शी** – येथील सावता नगर वाचनालयाचे माजी सचिव काशीरावजी साबळे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय 84 वर्षे होते. सामाजिक, शैक्षणिक आणि वाचन चळवळीत त्यांचे मोलाचे योगदान होते. वाचनालयाच्या विकासासाठी त्यांनी दीर्घकाळ सेवाभावी भूमिका बजावली.



त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सावता नगर वाचनालय येथे मंगळवार, 4 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 8.00 वाजता सामूहिक श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या वेळी क्षत्रिय माळी सेवा संस्था, मोर्शी; सावित्रीबाई फुले महिला मंडळ, मोर्शी; सावता नगर वाचनालय, मोर्शी तसेच ज्योती युवा मंचचे सभासद व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. काशीरावजी साबळे यांच्या निधनाने सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त करण्यात येत असून त्यांच्या कार्याची आठवण उपस्थितांनी भावपूर्ण शब्दांत काढली.

# श्री समर्थ गजानन महाराज संस्थान येथे 148 व्या प्रगट दिन महोत्सवाची उत्साहात सुरुवात

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 5)** – श्री समर्थ गजानन महाराज संस्थान, समर्थ विवेकानंद कॉलनी परिसर, अमरावती येथे 148 व्या प्रगट दिन महोत्सवाची आज भक्तिभावपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. या महोत्सवानिमित्त 1 ते 8 फेब्रुवारी 2026 या कालावधीत शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले असून पहिल्याच दिवशी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. शिवमहापुराण कथेचे कथाकथन आकाश महाराज लक्षणे (कोंडाळी) यांच्या मधुर व प्रभावी वाणीतून आठ दिवस होणार आहे. त्यांच्या रसाळ कथाकथन शैलीमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला असून उपस्थित भक्त कथा श्रवणात तल्लीन झाले होते. आजच्या कथेप्रसंगी आकर्षक झाकींचे सादरीकरण करण्यात आले, ज्यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. श्री समर्थ गजानन महाराज हे विदर्भातील थोर संत असून त्यांनी





भक्ती, सेवा, त्याग व मानवतेचे आदर्श मूल्य समाजापुढे ठेवले. त्यांच्या शिकवणीतून आत्मिक शांती, संयम व सकारात्मक जीवनदृष्टी मिळते. त्यामुळे दरवर्षी त्यांचा प्रगट दिन मोठ्या श्रद्धेने साजरा केला जातो. महोत्सवानिमित्त अभिषेक, पूजन, आरती, भजन व कीर्तन आदी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दूरदूरून आलेले भक्त, साधू-संत, महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. भाविकांच्या सोयीसाठी संस्थानच्या वतीने प्रसाद, स्वच्छता व अन्य आवश्यक सुविधांची योग्य व्यवस्था करण्यात आली आहे.

# इयत्ता 10 वी, 12 वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड, (दि. 5)** येथील नागोराव दादा सदाफळे नवोदय विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात नुकताच इयत्ता 10 वी व 12 वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्रीपादराव ढोमने (पाटील) होते. प्रमुख पाहुणे म्हणून मनोहरराव ढोमने, दिलीपराव कवठकर, रामेश्वर ढोमने, जयंत पाटील, शरदराव तिडके, प्रल्हाद बुले व सविताताई ठाकरे उपस्थित होते. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मुख्याध्यापिका सुनीता श्रीवास यांनी प्रास्ताविकातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेत त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी शिवानी केंडे, राधिका चव्हाण, खुशी आमटे, सम्यक गुडधे, प्राची निस्वादे, ग्रीष्मा



दंडाळे व प्रगती सातपुते या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात जयंत पाटील, प्रा. अमोल देशमुख, प्रा. हेमंत देशमुख, श्रीकांत विघे, महादेव नागदेवे व सविता ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत जीवनात ध्येय निश्चित करून परिश्रमाने यश संपादन करण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. हर्षाली ढोमने व एकता नागले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. हेमंत देशमुख, प्रा. अमोल देशमुख, संजय बोंडे, प्रा. साक्षी दुर्गे, उमेश चव्हाण, निलेश रायचुरा, महादेव नागदेवे, श्रीकांत विघे, स्वाती पारिसे, कविता वरठी, दिलीप अजमिरे तसेच पत्रकार जितेंद्र फुटाणे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विभागीय आयुक्तालयात 9 फेब्रुवारीला लोकशाही दिन

**अमरावती** – विभागीय लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार येत्या सोमवारी दि. 9 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 11 वाजता विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन विभागीय आयुक्त कार्यालयात करण्यात आले आहे, असे अपर आयुक्त संजय जाधव यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे. विभागीय लोकशाही दिनात यापूर्वी प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यात येईल. विभागीय लोकशाही दिनात तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांनी तसेच महिलांनी त्यांचे तक्रार अर्ज (तालुका, जिल्हा किंवा महापालिका लोकशाही दिनानंतर) विहित नमुन्यात 15 दिवस अगोदर दोन प्रतीत पाठविणे आवश्यक राहील.

## अंबाडा नजीक इस्रूर शेतशिवारातील जुगार अड्ड्यावर मोर्शी पोलिसांची धाड

### सुमारे 4.80 लाखांचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी (दि.5)**– मोर्शी पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंद्यांविरोधात कारवाईचे आदेश ठाणेदार पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांनी दिल्यानंतर गुन्हे प्रकटीकरण पथकाने प्रभावी कारवाई करत अंबाडा गावानजीक इस्रूर शेतशिवार (ता. मोर्शी) येथे सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर धाड टाकली.



दिनांक 4 फेब्रुवारी 2026 रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार ही कारवाई करण्यात आली. धाडीदरम्यान आरोपींकडून नगदी 8,700 रुपये, पाच मोबाईल फोन (अंदाजे किंमत 61,000 रुपये), तसेच घटनास्थळावरून सहा मोटरसायकली (अंदाजे किंमत 4,10,000 रुपये), 52 ताशांची पत्ते आणि जुगार खेळण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले. एकूण 4,79,950 रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत आणि उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वाखाली मोर्शी पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस उपनिरीक्षक आकाश शिवणकर, पोलीस अंमलदार छत्रपती करपते, स्वप्निल बायस्कर आणि अथर्व कोहळे यांनी ही यशस्वी कारवाई केली.

# धारणीत शेतकरी मेळावा व मिलेट महोत्सव

## मेळघाटातील शेतीला मिळणार नवी दिशा



**महासागर प्रतिनिधी**
**धारणी (दि.5)**– मेळघाटातील पारंपरिक तृणधान्यांना आधुनिक बाजारपेठ उपलब्ध करून देणे तसेच शेतकऱ्यांना प्रगत शेती पद्धतींची माहिती मिळावी, या उद्देशाने धारणी येथे आयोजित करण्यात आलेला ‘शेतकरी मेळावा व मिलेट महोत्सव’ उत्साहात पार पडला. या महोत्सवाचे उद्घाटन आमदार केवलराम काळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर माजी आमदार प्रभुदास भिलावेकर, सहायक जिल्हाधिकारी सिद्धार्थ शुक्ला, आत्मा प्रकल्पाच्या संचालिका अर्चना निस्ताने, तहसीलदार प्रदीप शेवाळे, गटविकास अधिकारी विजय गायकवाड, नगराध्यक्ष सुनील चौथमल यांच्यासह नीती आयोगाचे समन्वयक व अन्य मान्यवर उपस्थित होते.

महोत्सवात कोदो, कुटकी, नाचणी, बाजरी, वरई आदी पोषक तृणधान्यांचे आकर्षक प्रदर्शन भरविण्यात आले होते. विशेषत: महिला बचत गटांनी तृणधान्यांपासून तयार केलेले विविध खाद्यपदार्थ व मूल्यवर्धित उत्पादने उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती. शेतकऱ्यांना केवळ उत्पादनापुरते न थांबता प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि थेट बाजारपेठेशी जोडणी कशी करावी, याबाबत तज्ज्ञांकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.





उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार केवलराम काळे व माजी आमदार प्रभुदास भिलावेकर यांनी मेळघाटातील शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबतच फळशेती, बागायती व आधुनिक शेती पद्धती स्वीकाराव्यात, असे आवाहन केले. मेळघाटातील शेतकरी कष्टाळू आहे. आता उत्पादनाबरोबरच बाजारपेठेतील संधी ओळखून आर्थिक प्रगती साधण्याची गरज आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या महोत्सवामुळे परिसरातील शेतकरी, महिला व तरुणांना शेतीतील नव्या संधींची माहिती मिळाली असून, मेळघाटातील शेती विकासासाठी हा उपक्रम मैलाचा दगड ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## जाहिरात

जन्म प्रमाण पत्र मिळने बाबत वैष्णवी रामेश्वर जावरकर रा. खापरखेड़ा ता. धारणी यांचा जन्म दिनांक 05/09/2023 रोजी गांव खापरखेड़ा ता. धारणी येथे झालेला आहे. या बाबत ग्राम पंचायतमध्ये नोंद नाही परंतु यांना जन्म दाखल्याची आवश्यकता आहे. करिता कोनाला या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी 30 दिवसात आक्षेप दाखल करावे. सदर प्रसिद्धि ग्रामपंचायत खापरखेड़ा ता. धारणी येथे नोटिस बोर्ड वर लावण्यात आली आहे.

**वैष्णवी रामेश्वर जावरकर**

RNINO-46975/1985
Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५
महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पर्यायी मार्गाचा प्रस्ताव

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :** मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवरील वाहतूक कोंडी अखेर ३२ तासानंतर सुरळीत झाली आहे. महामार्गावर असलेल्या घाटात गॅसचा कंटेनर आडवा झाल्याने या वाहतूक कोंडी झाली होती. एकीकडे समृद्धी महामार्ग तयार केला आणि आता शक्तिपीठ महामार्गाच्या तयारीत असलेल्या सरकारचे या कोंडीमुळे अपयश समोर आले आहे.

विशेष म्हणजे या मुंबई-पुणे एक्सप्रेस वेला पर्यायी मार्गाचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन वर्षांपूर्वीच दिला होता. परंतु, हा प्रस्ताव मंत्रालयातील बांधकाम विभागात धूळ खात पडल्याचे समोर आले आहे.

वाहतूक कोंडीचा अहवाल सरकारने मागवला होता. त्यानुसार अशी माहिती समोर आली आहे की, पुणे एक्सप्रेस वेवरील संभाव्य धोका टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी पर्यायी व्यवस्था म्हणून कर्जत शिरूर महामार्ग सुचवला आहे. मात्र हा प्रस्ताव गेली दोन वर्षांपासून धूळ खात पडला आहे. सर्व घाटमाथ्यांवरील रस्त्यांमध्ये २० ते २५ किमीचे अंतर आहे.

मात्र माळशेज ते लोणावळा या घाटमाथ्यावरील रस्त्यामध्ये ७०-८० किमीचे अंतर आहे. त्यामुळे पुणे मुंबई एक्सप्रेस वेवर कितीही बदल केला तरी वाहतूक कोंडीचा प्रश्न कायम राहणार आहे. तसेच कर्जत शिरूर महामार्गाचे काम करावेच लागले, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

**कर्जत शिरूर महामार्ग करण्याचा प्रस्ताव**

मुंबई एमएमआर रिजन, जेएनपीटीच्या अवजड वाहनांना पुणे, सोलापूर, अहिल्यानगर, हैदराबाद तसेच मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत जाण्यासाठी एक्सप्रेस वे हा एकमेव मार्ग आहे.




त्यामुळे भविष्यातील वाहतूक कोंडी लक्षात घेता याला पर्याय म्हणून कर्जत शिरूर महामार्ग करावा, असा प्रस्ताव सरकारला देण्यात आलेला आहे.

**मुख्यमंत्र्यांकडून गंभीर दखल**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गंभीर दखल घेतली असून प्रशासनाला महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी फडणवीस यांनी या परिस्थितीची सखोल चौकशी करून उपाययोजनांसह सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश 'एमएसआरडीसी'ला दिले आहेत.

दुसरीकडे एकनाथ शिंदे यांनी आपत्कालीन वाहतूक आराखडा तातडीने तयार करण्याच्या सूचना देऊन 'मिसिंग लिंक' प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत.

## अंत्यविधीच्या वेळी विलीनीकरणाची चर्चा कोणी आणि कशासाठी केली?



■ **मुंबई :** अजित पवार यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवलेले असताना त्या ठिकाणी विलीनीकरणाबाबत चर्चा कोणी आणि कशासाठी केली? हा प्रश्न जनतेसमोर यायला हवा, असे राकाँचे अध्यक्ष सुनील तटकरे यांनी म्हटले आहे

व्हिडिओमध्ये दिसलेल्या काही नेत्यांनी घड्याळ चिन्हावर निवडणूक लढण्याची चर्चा झाल्याचे सांगितले, मात्र मी स्वतः त्या ठिकाणी उपस्थित नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे शपथविधी आणि विलीनीकरण हे दोन वेगळे मुद्दे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

त्यांनी सांगितले की, या विषयावर वेगळे वातावरण तयार करण्यात आले आणि त्यात स्वतः ते आणि प्रफुल पटेल यांच्यावरही टीका झाली. मात्र सुनेत्रा पवार यांनी स्वतःला सावरत पक्षाच्या विचारांना पुढे नेण्यासाठी पाऊल उचलले, हे महत्त्वाचे आहे.

उद्धव ठाकरे यांच्या पक्षाने अजित पवार यांच्या अपघाताची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी केली आहे. याबाबत विचारले असता तटकरे यांनी सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस आणि राज्य सरकारने आधीच केंद्राच्या नागरी उड्डाण मंत्रालयाकडे सखोल चौकशीची विनंती केली आहे. या घटनेतील सत्य लवकरात लवकर जनतेसमोर यावे, हीच पक्षाची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.

## पालघरमध्ये बेकायदा राहणारे शंभरावर नायजेरियन ताब्यात



■ **पालघर :** पालघर जिल्ह्यात बेकायदेशीरपणे राहणाऱ्या परदेशी नागरिकांविरुद्ध कारवाई करत पोलिसांनी नालासोपारा पूर्व परिसरात १०९ नायजेरियन नागरिकांना कागदपत्रांच्या पडताळणीसाठी ताब्यात घेतले. या शोधमोहिमेदरम्यान २ किलो कोकेन जप्त करण्यात आले असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली.

ताब्यात घेतलेल्यांपैकी अद्याप एकानेही वैध प्रवास आणि वास्तव्याची कागदपत्रे सादर केलेली नाहीत. मीरा-भाईंदर वसई-विरार पोलिसांच्या पथकांनी सकाळी ६ वाजता कोम्बिंग ऑपरेशन सुरू केले, अशी माहिती पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले-शृंगी यांनी दिली. अमली पदार्थांच्या तस्करीसोबतच हे नागरिक बेकायदेशीर दुकाने चालवत असल्याचेही समोर आले आहे. वसई-विरार महानगर पालिकेकडेही या कारवायांची माहिती होती. त्यामुळे अमली पदार्थ आणि बेकायदेशीर बांधकामांविरोधात ही संयुक्त कारवाई करण्यात आली. पोलिसांनी कागदपत्रे सादर करण्याची संधी दिली आहे.

पोलिस उपायुक्त पुढे म्हणाल्या, आतापर्यंत एकाही व्यक्तीला वैध कागदपत्रे दाखवता आलेली नाहीत. जे लोक कायदेशीर कागदपत्रे सादर करतील त्यांना राहू दिले जाईल, परंतु जे अपयशी ठरतील त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल आणि त्यांना त्यांच्या देशात परत पाठवले जाईल.ह्व कमी घरभाड्यामुळे हे परदेशी नागरिक या भागाला पसंती देतात, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, पोलिस ताब्यात घेण्यात आलेल्या सर्वांची कसून चौकशी करत असल्याचे स्थानिक पोलिसांनी या वेळी सांगितले. नालासोपारा, आचोले आणि तुळिंज भागात राहणारे नायजेरिया, युगांडा आणि घाना येथील परदेशी नागरिक वारंवार अमली पदार्थांच्या तस्करीमध्ये सामील असल्याचे आढळले आहे.

## वसूल केलेला टोल परत करा...

### वाहतूक कोंडीवर 'राज'संताप



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ५ :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर अभूतपूर्व वाहतूक कोंडी निर्माण झाली.

या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडियावरून सरकारवर टीका केली. अर्थसंकल्पात मुंबई-पुणे हायस्पीड ट्रेनची घोषणा करण्यात आली असली, तरी त्याआधी सध्याचा प्रवास सुरळीत करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. या काळात प्रवाशांकडून वसूल करण्यात आलेला टोल सरकारने परत करावा, अशी मागणी करीत मूलभूत सुविधा न देता टोल वसूल करणे योग्य नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग जवळपास ३२ तास ठप्प होता. प्रवाशांचे कमालीचे हाल झाले. आणि यानंतर नेहमीप्रमाणे सरकारकडून या प्रकरणाच्या फक्त चौकशीचे आदेश दिले गेले. या आणि अशा अनेक घटनांच्या अनेक चौकश्या होतात. पुढे त्यातून काही बोध सरकार,प्रशासन घेतं का? हा प्रश्न आहे.

गॅसचा टँकर उलटला. त्यानंतर सुरक्षेचा पर्याय म्हणून वाहतूक थांबवली गेली, हे पण योग्य झालं. पण अशा घटना घडल्या तर काय काय उपाययोजना करून कमीत कमी वेळेत रस्ता मोकळा करता येईल याचा कृती आराखडा प्रशासनाकडे तयार होता का? स्व. बाळासाहेबांच्या प्रेरणेतून हा द्रुतगती मार्ग उभा राहिला, त्याला २४ वर्ष उलटली. पण या काळात काय काय आपत्ती येऊ शकते ना याचा विचार केला गेला ना संपूर्ण रस्ता उत्तम दर्जाचा राहील हे पाहिलं गेलं. मधल्या काळात एकच गोष्ट तत्परतेने केली गेली ती म्हणजे टोल वसुली.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचं टोलचं आंदोलन हे टोल घेण्याच्या बाबतीतलं नव्हतंच. ते होतं जर टोल घेता, तर मग सरकार, टोल वसूल करणारी कंपनी काय सुविधा प्रवाशांना देते याबद्दलचं. कालच्या घटनेनंतर हाच प्रश्न आहे की, रस्ता बांधला आणि टोल वसुल केला इतकीच सरकारची जबाबदारी आहे का ? असे अनेक सवाल त्यांनी उपस्थित केलेत.

# पत्रकारांच्या मानसिक आरोग्यासाठी १० दिवस उपक्रम

### महाराष्ट्र पत्रकार मेडिटेट्स, व्हॉईस ऑफ मीडिया व आर्ट ऑफ लिव्हिंगच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन मेडिटेशन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :** आजच्या काळात पत्रकारांना प्रचंड मानसिक तणावाला सामोरे जावे लागत आहे. चोवीस तास बातम्यांचा पाठलाग, सततच्या डेडलाईन्स, फील्ड वर्क, वैयक्तिक व कौटुंबिक जबाबदाऱ्यांची ओढाताण याचा थेट परिणाम पत्रकारांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावर होत आहे.

ही बाब लक्षात घेऊन व्हॉईस ऑफ मीडिया व्हीओएम इंटरनॅशनल फोरम यांच्या वतीने आणि द आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या सहकार्याने महाराष्ट्र पत्रकार मेडिटेट्स हा १० दिवसांचा विशेष ऑनलाईन मेडिटेशन उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. सलग १० दिवस गुरुदेव श्री. श्री. रविशंकर गुरुजीसह संपादक, पदाधिकारी करणार मार्गदर्शन करणार आहेत. द आर्ट ऑफ लिव्हिंगचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सलील पुळेकर हे सर्व शेषन लीड करणार आहेत.

हा उपक्रम २३ फेब्रुवारी ते ४ मार्च या कालावधीत दररोज सकाळी ७ ते ८ या वेळेत ऑनलाईन स्वरूपात होईल. नामवंत संपादक, ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व व्हॉईस ऑफ मीडियाच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती लाभणार आहे.

२३ फेब्रुवारी रोजी महासागर मीडिया ग्रुपचे संपादक-संचालक श्रीकृष्ण चांडक प्रमुख उद्घाटक म्हणून सहभागी होणार असून, व्हीओएम इंटरनॅशनल फोरमचे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांची प्रमुख उपस्थिती राहील तर अध्यक्षपद शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर भूषवतील.

२४ फेब्रुवारी रोजी लोकशाहीचे संपादक विशाल पाटील उद्घाटक म्हणून सहभागी होतील. व्हीओएम इंटरनॅशनल फोरमचे राज्य उपाध्यक्ष अजित दादा कुंकूलोळ प्रमुख अतिथी तर राष्ट्रीय संघटक सारिका महोत्रा अध्यक्षस्थान भूषवतील. २५ फेब्रुवारी रोजी ज्येष्ठ पत्रकार व संपादक तुळशीदास भोईटे उद्घाटक असतील. व्हीओएम इंटरनॅशनल फोरमचे संचालक, मुख्य संयोजक गोरक्षनाथ मदने अतिथी तर संचालक व्यंकटेश जोशी अध्यक्ष असतील.

२६ फेब्रुवारी रोजी पुढारी न्यूज टीव्हीचे संपादक प्रसन्न जोशी उद्घाटक, व्हीओएम इंटरनॅशनल फोरमचे संचालक किशोर कारंजेकर अतिथी तर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या गोदावरी बँक समूहाच्या अध्यक्षा राजर्षी पाटील अध्यक्षपद भूषवतील. २७ ला एबीपी माझाच्या संपादक सरिता कौशिक उद्घाटक, व्हीओएमच्या प्रदेशाध्यक्ष रश्मी मारवाडी अतिथी तर उद्योजक राणा सूर्यवंशी अध्यक्ष असतील. २८ ला लोकमतचे संपादक धर्मराज हल्लाळे उद्घाटक, व्हीओएमचे कार्याध्यक्ष नरेंद्र देशमुख अतिथी व उद्योजक वैभव वानखडे अध्यक्ष असतील.

१ मार्च रोजी फ्री प्रेस जर्नल, नवशक्तीचे समूह राजकीय संपादक रविकिरण देशमुख उद्घाटक, व्हीओएमचे प्रदेश कार्याध्यक्ष विजय चोरडिया अतिथा तर सामाजिक कार्यकर्त्या शिल्पा शेटे अध्यक्षपद भूषवतील. २ मार्च रोजी मॅक्स महाराष्ट्रचे संपादक रवींद्र आंबेकर उद्घाटक, विभागीय अध्यक्ष संगम कोटलवार अतिथी आणि व्हीओएमचे आरोग्य विंग प्रमुख भीमेश मुतुला अध्यक्षस्थान भूषवतील.

३ मार्च रोजी ज्येष्ठ पत्रकार अशोक वानखडे उद्घाटक असतील. प्रदेश कार्याध्यक्ष कुमार कडलक अतिथी तर उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष कल्पेश महाले अध्यक्षपद भूषवतील. समारोपाच्या दिवशी ४ मार्च रोजी ज्येष्ठ पत्रकार विश्वास देवकर उद्घाटक म्हणून सहभागी होतील. व्हीओएम इंटरनॅशनल फोरमचे सर्व विंग प्रमुख अमोल मतकर प्रमुख अतिथी आणि राष्ट्रीय कोषाध्यक्ष चेतन बंडेवार अध्यक्ष असतील. सर्व सहभागींना प्रमाणपत्र आणि खास बक्षीस दिले जाईल.

**कार्यक्रमात सहभागी कसे व्हायचे?**

महाराष्ट्र पत्रकार मेडिटेट्स हा १० दिवसांचा ऑनलाईन मेडिटेशन उपक्रम पूर्णतः मोफत असून सर्व पत्रकार, संपादक, माध्यम क्षेत्रातील कर्मचारी आणि मीडिया विद्यार्थ्यांसाठी खुला आहे. व्हीओएम इंटरनॅशनल फोरमचे सदस्य आणि पदाधिकाऱ्यांसाठी खास व्यवस्था, सुविधा करण्यात आली आहे.

सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी व्हॉईस ऑफ मीडिया व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमच्या व्हॉट्सॲप ग्रुप अथवा सोशल मीडिया माध्यमांद्वारे नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर सहभागी सदस्यांना कार्यक्रमाची झूम ऑनलाईन लिंक संबंधित माध्यमातून पाठविण्यात येईल.

कार्यक्रम दररोज सकाळी ७ ते ८ या वेळेत ऑनलाईन स्वरूपात होणार असून सहभागी सदस्यांनी वेळेआधी लॉग-इन करण्याबरोबरच अधिक माहिती व नोंदणीसाठी व्हॉईस ऑफ मीडियाच्या जिल्हा व विभागीय पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. इच्छुकांनी aoliv.in/voiceofmedia या लिंकवर नोंदणी करावयाची आहे.

# अजिंक्य : ध्येयवेड्या तरुणाची जागतिक भरारी

अजिंक्य जेव्हा घरून निघाला, तेव्हा त्याच्या मनात एकच ध्यास होता, हे जग काबीज करण्याचा. त्याला आयुष्यात काहीतरी वेगळं करून दाखवायचं होतं. खेळाची ओढ त्याच्या नसानसात इतकी भिनली होती की, त्या विशाल मैदानापुढे त्याला संपूर्ण जग छोटं वाटू लागलं होतं. पदवी, नोकरी आणि व्यवसाय या पारंपारिक चौकटीत न अडकता त्याने सर्वात आधी निवडलं ते फुटबॉलचं मैदान. पुण्याच्या शिक्रापूरचा हा तरुण आज सातासमुद्रापार स्पेनमध्ये आपल्या कर्तृत्वाचा झेंडा फडकावतोय, ही केवळ त्याची वैयक्तिक प्रगती नसून महाराष्ट्रासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

---

अजिंक्यची कौटुंबिक पार्श्वभूमी अत्यंत सधन आणि सुशिक्षित. वडील डॉ. कुमार मांढरे हे पुण्यातील नामवंत बालरोगतज्ज्ञ, तर आई अनुषा मांडरे एका प्रख्यात भारती विद्यापीठ मधून प्राध्यापक म्हणून सेवानिवृत्त झालेल्या. घरात मामा जिल्हाधिकारी, तर काका यशस्वी शेतकरी.

अशा सुसंस्कृत आणि यशस्वी लोकांच्या गराड्यात वाढणाऱ्या मुलाने डॉक्टर किंवा प्रोफेसर व्हावं, अशी पालकांची स्वाभाविक इच्छा होती. पण या 'पठ्ठ्या'चं मन मात्र पहाटेपासून रात्रीपर्यंत केवळ फुटबॉलच्या किकमध्ये रमायचं. त्याला फुटबॉलमध्ये केवळ करिअरच करायचं नव्हतं, तर या खेळाचा रस प्रत्येक तरुणाच्या मनात रुजवायचा होता. स्वतःच्या छंदाला ध्यासात रूपांतरित करून त्याने जे विश्व उभं केलं, ते पाहून आज त्याच्या पालकांचा ऊर अभिमानाने भरून येतो.

अजिंक्यचा हा प्रवास २०१५ मध्ये सुरू झाला, जेव्हा तो शिक्षणाच्या निमित्ताने, एमबीए करण्यासाठी स्पेनला गेला. ज्या फुटबॉल विश्वाचं केंद्र म्हणून स्पेनकडे पाहिलं जातं, तिथल्या माद्रिड शहरात त्याला आपल्या कौशल्याची चुणूक दाखवण्याची संधी मिळाली. आज तो तिथल्या 'युनिकॉन स्पोर्ट्स'मध्ये एका मोठ्या पदावर कार्यरत आहे.

खेळाडू ते थेट मॅनेजमेंट आणि कोचिंगपर्यंतची त्याची मजल थक्क करणारी आहे. २०३० चा फुटबॉल वर्ल्डकप स्पेनमध्ये होणार आहे आणि या मोठ्या जागतिक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर अजिंक्य मांढरे तिथे भारतीय संस्कृतीची आणि आपल्या कार्यक्षमतेची छाप पाडण्यासाठी सज्ज झाला आहे.

आपल्या अनुभवांबद्दल बोलताना अजिंक्य अत्यंत सकारात्मकतेने सांगतो की, खेळाकडे केवळ छंद म्हणून न पाहता ते करिअर, आरोग्य आणि नाविन्यपूर्ण शोधाचं एक माध्यम म्हणून पाहिलं पाहिजे. अनेकदा तरुण मुलं भविष्याबद्दल गोंधळलेली असतात, अशा वेळी अजिंक्य मांढरे त्यांना हाच सल्ला देतो की, तुम्हाला जे मनापासून आवडतं, त्यामध्येच झोकून देऊन काम करा.

त्याने भारतातही अनेक मुलांना फुटबॉलचे धडे दिले आहेत आणि आता स्पेनमध्ये मॅनेजमेंटची जबाबदारी सांभाळताना त्याला आपल्या मातीचा विसर पडलेला नाही. तिथल्या सरकारचा खेळाप्रती असलेला गांभीर्य पाहून, तसाच दृष्टिकोन जगभरात निर्माण व्हावा, अशी त्याची प्रामाणिक इच्छा आहे.



जेव्हा मी आज माद्रिडच्या या भव्य फुटबॉल स्टेडियममध्ये उभा राहतो आणि भोवताली हजारो लोकांचा जल्लोष ऐकतो, तेव्हा क्षणार्धात माझे मन हजारो मैल दूर पुण्यातील शिक्रापूरच्या त्या धुळीने माखलेल्या मैदानावर पोहोचते.

माझा हा प्रवास केवळ एका शहरातून दुसऱ्या शहरात केलेला प्रवास नाही, तर तो एका स्वप्नाचा पाठलाग करताना स्वतःला सिद्ध करण्याचा संघर्ष आहे. आजही आठवतो तो काळ, जेव्हा हातात फुटबॉल घेऊन मी तासनतास सराव करायचो.

घरात वडिलांच्या रूपात वैद्यकीय क्षेत्रातील आदर्श होता आणि आईच्या रूपात ज्ञानाची शिदोरी होती. एक डॉक्टर म्हणून वडिलांना मी त्यांच्या पावलावर पाऊल टाकावे असे वाटणे स्वाभाविक होते, तर आईला मी एका मोठ्या पदावर काम करताना पाहायचे होते.

अशा सधन आणि उच्चविद्या विभूषित वातावरणात 'फुटबॉल' हे करिअर म्हणून निवडणे म्हणजे प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्यासारखे होते. पण माझ्या मनात त्या कातडी चेंडूने जे स्थान निर्माण केले होते, त्यापुढे मला जगातील इतर कोणतीही पदवी मोठी वाटत नव्हती.

२०१५ मध्ये जेव्हा मी पहिल्यांदा शिक्षणाच्या निमित्ताने स्पेनच्या भूमीवर पाय ठेवला, तेव्हा डोळ्यांत स्वप्ने आणि मनात थोडी धाकधूक होती. सुरुवातीचे दिवस सोपे नव्हते. भाषेचा अडथळा, घराची आठवण आणि एका परक्या देशात स्वतःची ओळख निर्माण करण्याचे आव्हान समोर होते. पण जसा काळ सरकत गेला, तसा स्पेनचा हा 'फुटबॉल वेडा' देश मला आपला वाटू लागला.

आज जेव्हा मी 'युनिकॉन स्पोर्ट्स'मध्ये एका जबाबदार पदावर काम करतो, तेव्हा मला जाणीव होते की, माझ्या जिद्दीने केवळ माझे आयुष्य नाही, तर माझ्या पालकांचे मस्तकही अभिमानाने उंच केले आहे. आज जेव्हा माझे बाबा आनंदाने लोकांना सांगतात की त्यांचा मुलगा स्पेनमध्ये फुटबॉल विश्वात नाव कमावतोय, तेव्हा त्यांच्या आवाजातील तो थरार माझ्यासाठी कोणत्याही जागतिक पुरस्कारापेक्षा मोठा असतो असे अजिंक्य सांगत होता.




mahasagarngp@gmail.com

अजिंक्यच्या आई म्हणाल्या, आज जेव्हा मी मागे वळून पाहते, तेव्हा डोळ्यांसमोर येतो तो छोटासा अजिंक्य, जो घरातल्या भिंतींवर फुटबॉल मारून आवाज करायचा. तेव्हा मला राग यायचा, मी ओरडायचे, कारण एका आईच्या मनात मुलाच्या भविष्याबद्दलच्या साध्या-सुध्या अपेक्षा होत्या.

आम्ही दोघेही उच्चशिक्षित, घरात अभ्यासाचं वातावरण, त्यामुळे त्यानेही त्याच वाटेवर जावं असं वाटणं स्वाभाविक होतं. मी स्वतः प्रोफेसर होते, त्यामुळे मला वाटायचं माझ्या मुलानेही ज्ञानाच्या क्षेत्रात नाव कमावावं. पण त्याच्या नसानसात मात्र खेळाचं वेड धावत होतं.

आज जेव्हा जगाच्या नकाशावर तो स्वतःचं स्थान निर्माण करताना दिसतोय, तेव्हा मला माझ्या त्या ओरडण्याचं हसू येतं आणि त्याच्या जिद्दीचं कौतुक वाटतं.

एक आई म्हणून मुलाला स्वतःपासून हजारो मैल दूर पाठवणं सोपं नसतं. २०१५ मध्ये जेव्हा तो स्पेनला जायला निघाला, तेव्हा काळजात एक मोठी पोकळी निर्माण झाली होती. परका देश, वेगळी भाषा, वेगळी संस्कृती... तिथे माझा मुलगा कसा राहील, काय खाईल, त्याला कोणाची सोबत मिळेल, असे असंख्य प्रश्न मनात होते.

पण अजिंक्यने कधीच आम्हाला त्याची उणीव भासू दिली नाही. त्याने तिथल्या आव्हानांना आपलंसं केलं. आज तो तिथे केवळ स्वतःचं करिअर करत नाहीये, तर भारताच्या अनेक मुलांसाठी संधीचे दरवाजे उघडून देतोय, हे ऐकून ऊर अभिमानाने भरून येतो.

मला आठवतंय, तो लहान असताना कित्येकदा खेळाच्या नादात जेवायचं विसरून जायचा. आज तोच ध्यास त्याला स्पेनच्या माद्रिडसारख्या शहरात घेऊन गेला आहे, जिथे फुटबॉलचा श्वास घेतला जातो. २०३० चा वर्ल्डकप स्पेनमध्ये होणार आहे आणि त्या मोठ्या नियोजनाचा माझा मुलगा एक भाग असणार आहे, हे स्वप्नवत वाटतं.

जेव्हा तो फोनवर तिथल्या गोष्टी सांगतो, तेव्हा त्याच्या आवाजातला तो उत्साह बघून मला जाणीव होते की, आम्ही त्याला डॉक्टर किंवा प्रोफेसर बनवलं असतं, तर कदाचित तो इतका आनंदी नसता. त्याने त्याच्या आवडीचं सोनं केलंय.

एक काळ असा होता की आम्हाला काळजी वाटायची की खेळाचं मैदान त्याला आयुष्यात कुठे घेऊन जाईल? पण आज त्याने दाखवून दिलं की जर प्रामाणिक कष्ट आणि खेळावर निस्सीम प्रेम असेल, तर ते मैदान तुम्हाला आभाळाएवढं यश मिळवून देऊ शकतं. शिक्रापूरच्या मातीत खेळणारा माझा मुलगा आज जागतिक फुटबॉल मॅनेजमेंटमध्ये आपली ओळख निर्माण करतोय, यापेक्षा मोठी गुरुदक्षिणा एका आईसाठी दुसरी कोणती असू शकते? आईसाठी अजिंक्यचा प्रवास एक इतिहास आहे.

२०३० चा फुटबॉल वर्ल्डकप स्पेनमध्ये होणार आहे, ही बातमी ऐकल्यावर मनात एक वेगळीच ऊर्मी दाटून येते. या जागतिक सोहळ्याचा एक भाग होणे आणि तिथे आपल्या भारतीय संस्कृतीची छाप उमटवणे, हेच आता माझे ध्येय आहे. मला नेहमी वाटते की, भारतातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील मुलांमध्ये अफाट टॅलेंट आहे. त्यांना फक्त योग्य मार्गदर्शनाची आणि संधीची गरज आहे.

मी जेव्हा इथल्या मॅनेजमेंटमध्ये काम करतो, तेव्हा माज्या मनात नेहमीच माज्या देशातील त्या तरुण खेळाडूंचा विचार असतो, ज्यांना फुटबॉलमध्ये करिअर करायचे आहे. मी या खेळाला केवळ एक खेळ मानत नाही, तर ती एक जीवनपद्धती आहे असे समजतो.

अनेकांना वाटते की खेळाकडे वळल्याने करिअर खराब होते, पण मला त्या सर्वांना सांगायचे आहे की, जर तुमच्यात जिद्द असेल, तर खेळ तुम्हाला आरोग्य, नाव आणि जागतिक ओळख मिळवून देऊ शकतो. आज मी जो काही आहे, तो माझ्या पालकांचे आशीर्वाद आणि फुटबॉलवर असलेल्या निस्सीम प्रेमामुळे.

शिक्रापूर ते स्पेन हा प्रवास खडतर होता, पण तो तितकाच सुंदरही आहे. अजून खूप काही मिळवायचे आहे, अजून खूप काही शिकायचे आहे, पण या सगळ्यात माझ्या मातीचा सुगंध आणि भारताचा तिरंगा नेहमीच माझ्या काळजाच्या जवळ असेल. हे जग काबीज करायला निघालो असलो, तरी माझी मुळं आजही महाराष्ट्राच्या मातीतच रुजलेली आहेत.

अजिंक्यने स्वीकारलेलं हे फुटबॉलचं 'धनुष्य' तो समर्थपणे पेलत आहे. त्याची ही धडपड भारतातील त्या प्रत्येक तरुणासाठी आदर्श आहे जो आपली स्वप्नं पूर्ण करण्यासाठी धडपडतोय. अजिंक्यने जगभरातील सर्व कौशल्ये आत्मसात करावीत आणि आपल्या देशाला फुटबॉलच्या नकाशावर गौरवास्पद स्थान मिळवून द्यावे, हीच प्रत्येक भारतीयाची भावना आहे. त्याच्या या 'अजिंक्य' प्रवासाला आणि भावी वाटचालीस आमच्या मनापासून खूप खूप शुभेच्छा.

---

**अजिंक्य मांढरे संपर्क क्रमांक**
**9890346430**

## महत्त्वाकांक्षी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचे
# प्रत्यक्ष काम वर्षभरात सुरु होणार

### व्हीआयडीसीचे नियोजन : विदर्भातील सिंचनाचे चित्र पालटणार

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ५ :** नागपूर-सिंचनाच्या पुरेशा सुविधा नसलेल्या विदर्भातील जिल्ह्यांचे संपूर्ण चित्रच बदलून टाकण्याची क्षमता असलेल्या महत्त्वाकांक्षी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प सध्या विविध मान्यतांच्या टप्प्यात आहे.

या वर्षातच ही प्रक्रिया पूर्ण होऊन प्रकल्पाच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात होऊ शकेल, असा विश्वास विदर्भ सिंचन विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. त्या दृष्टीने मंजुरीच्या प्रक्रियेलाही गती देण्यात आली आहे.

या प्रकल्पास २०२४ मध्ये राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली आहे. या प्रकल्पाचा सुमारे ९४ हजार ९१२ कोटी रुपये किमतीचा प्रकल्प अहवाल मे. सिएन्सीस टेक लिमिटेड या कंपनीने तयार केला असून तो शासनाकडे प्रशासकीय मान्यतेच्या प्रक्रियेत आहे. हा प्रकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अग्रक्रमावर घेतला असून वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.

येत्या काही महिन्यांत प्रकल्पासाठी वन विभागाची मान्यता तसेच पर्यावरण मान्यतेसह प्रकल्पाचा सविस्तर प्रस्ताव मंजुरीसाठी केंद्रीय जल आयोगाकडे सादर करण्याची प्रक्रिया देखील सोबतच पार पाडली जाणार आहे. त्यामुळे वेळेची बचत होऊन विलंब टाळता येणार आहे. त्यामुळे वर्षभरात प्रत्यक्षात प्रकल्पाच्या कामाला सुरुवात होऊ शकते, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

**८ जिल्ह्यांना लाभ**

या प्रकल्पाचे स्वरुप अत्यंत व्यापक आहे. वैनगंगा नदीवरील गोसेखुर्द (इंदिरा सागर) राष्ट्रीय प्रकल्पातून तापी उप-खोऱ्यामधील नळगंगा नदीवरील प्रकल्पात सुमारे १,८०४ दलघमी पाणी वळविण्यात येणार आहे. यामुळे विदर्भातील भंडारा, नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशीम आणि बुलडाणा या ८ जिल्ह्यांमधील सुमारे ४ लाख ४ हजार २८१ हेक्टरचे शेतीक्षेत्र सिंचनाखाली आणता येणार आहे. याशिवाय, औद्योगिक तसेच घरगुती पाणी वापराच्या सुविधाही मोठ्या प्रमाणात निर्माण होणार आहेत.

पाणी वळविण्यासाठी सुमारे ३८८.२८ किलो मीटर लांबीच्या नदीजोड कालव्याची निर्मिती केली जाणार आहे. त्यातून वैनगंगेतील अतिरिक्त असे १,८०४ दलघमी पाणी पावसाळ्यातील ७० दिवसांच्या कालावधीत कालव्याद्वारे नेण्यात येणार आहे.

नाशिकच्या जलविज्ञान प्रकल्पाकडून यासाठीच्या तांत्रिक बाबींचा अभ्यासही पूर्ण झाला असून गेल्यावर्षी सादर झालेल्या अहवालाच्या माध्यमातून ही योजना पुरेशी किफायतशीर असल्याचे स्पष्ट झाले आहे.

जोड कालव्यात तब्बल १३ बोगद्यांचा (एकूण लांबी २३.७७ कि.मी.) समावेश राहणार आहे. त्याचप्रमाणे सुमारे २९२ किलो मीटरचा उर्वरित टप्पा हा खुल्या कालव्याच्या स्वरुपात राहणार आहे. तर ८ ठिकाणी पंपाच्या साह्याने पाणी उचलावे लागणार आहे.

**साठवण तलावांची तरतूद**

नदीजोड कालव्याच्या माध्यमातून उपलब्ध होणारा पाणीसाठा प्रामुख्याने रब्बी हंगामासाठी वापरला जाणार असून त्यासाठी ५० पाणी साठवण तलावही या योजनेत समाविष्ट आहेत. यापैकी सध्या १८ तलाव अस्तित्वात असून त्यापैकी १० तलावांची उंची वाढवावी लागणार आहे. तर उर्वरित ३२ तलाव नव्याने बांधले जाणार आहेत.

तसेच वर्धा नदीवरील सध्या अस्तित्वात असलेल्या निम्न वर्धा प्रकल्प, काटेपूर्णा नदीवरील काटेपूर्णा व नळगंगा प्रकल्प अशा तीन प्रकल्पांचा साठवण तलाव म्हणून वापर केला जाणार आहे.

**घरगुती आणि औद्योगिक वापर**

मुख्य कालव्याच्या परिसरातील गावे, शहरे आणि औद्योगिक क्षेत्रांच्या गरजांनुसार घरगुती (८० दलघमी) व औद्योगिक वापराच्या (१३९ दलघमी) तरतुदीही या प्रकल्पात करण्यात आल्या आहेत.

सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा असलेल्या जिल्ह्यांचे चित्र पालटण्याची क्षमता या प्रकल्पाची असून सारेकाही नियोजनानुसार पार पडल्यास या वर्षभरातच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होऊ शकते, असा विश्वास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

